# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र.५०** **// स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त //** **दिनांक २०/०९/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२०/०९/२०२१ सोमवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.राजेंद्र झिपरू पाटील यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. राजेंद्र झिपरू पाटील, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | बाविस्कर किशोर रमेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | पाटील कुलभुषण विरभान |
| देशमुख प्रतिभा गजानन | लढ्ढा नितीन बालमुकुंद |
| चव्हाण ज्योती बाळासाहेब | बरडे नितीन मनोहर |
| बेंडाळे उज्वला मोहन | नाईक प्रशांत सुरेश |
| नेरकर सरिता अनंत | शेख सईदा युसुफ |

सदर सभेस, मा.अति.आयुक्त. सौ. विद्या गायकवाड, मा.उपायुक्त,श्री. शाम गोसावी, मा.उपायुक्त, श्री. प्रशांत पाटील, मुख्य लेखापरिक्षक, श्री. संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी. श्री. कपिल पवार, सहा.आयुक्त. श्री. पवन पाटील , नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

मा.सभापती :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**सौ. ज्योती चव्हाण :-** मा.सभापती महोदय , आमचा एक विषय आहे तो आधी घेताय की नंतर घेताय. डेंग्यु व कुत्र्यांविषयी बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** ताई सभेच्या विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर हे विषय घेवु व चर्चा करू. आपले जे काही विषयपत्रिकेवरील विषय असतील ते संपल्यानंतर अवांतर चर्चा करण्यात येईल.

**सौ. ज्योती चव्हाण :-** चालेल.

नगरसचिव :- स्थायी समिती सभा क्रं. ५० , विषयपत्रिका क्रं. ५० वरील विषयांना सुरुवात करणेत येत आहे.

नगरसचिव:- विषय क्र. १) दि.०६/०८/२०२१ रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर सभेचे इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे दि.०६/०८/२०२१ रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

नगरसचिव:- विषय क्र. २) स्थायी समिती ठराव क्र.३३८ दि.३०/०६/२०२१ अन्वये तहकूब विषयाचे अनुषंगाने प्रशासनाने सादर केलेल्या दैनिक बाजार वसुली सर्व्हेक्षणाचे कागदपत्रांची माहिती घेवुन कोविड-१९ कालावधीतील (दि.२२/०३/२०२० ते दि.१५/१०/२०२०) दैनिक बाजार शुल्क वसुली बाबतच्या अहवालास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्तावाला मान्यता देण्यात यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हॅलो प्रशासनाकडून जो प्रस्ताव आलेला आहे तो मान्य आहे याला माझे अनुमोदन आहे..

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दैनिक बाजार शुल्क वसुली मक्तेदार श्री.किरण शंकरराव भालोदकर यांना जा.क्र./कि.व.वि./४७८/२०१९-२० दि.१०/०७/२०१९ अन्वये दैनिक बाजार शुल्क वसुलीचा मक्ता दि.११/०७/२०१९ ते दि.१०/०७/२०२० या कालावधी करीता रु.१,५४,००,०००/- व दि.११/०७/२०२० ते दि.१०/०७/२०२१ या कालावधीकरीता रु.१,६९,४०,०००/- अशा रकमेचा देण्यात आला आहे. मक्तेदार यांनी वेळोवेळी अर्ज सादर केलेले आहेत. सदर अर्जात मक्तेदार यांनी दि.२२ मार्च २०२० पासून आजपावेतो कोविड-१९ या जागतीक महामारीमुळे केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी लॉकडाऊन घोषीत केले होते. त्यामुळे जळगांव शहरातील डेली बाजार फी वसुली झालेली नाही. त्याचप्रमाणे जळगांव शहरात जवळपास तीन हजार कंन्टेंन्टमेंट झोन असल्याने संबधीत भागातील सर्व हॉकर्स बंद होते. त्याचप्रमाणे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विना मास्क रस्त्यावर फिरणे, सोशल डिस्टन्सींगचे पालन न करणे याबाबत म.न.पा.तर्फे कारवाई करण्यात येत असल्याने हॉकर्स कडून डेली बाजार फी वसुली होत नव्हती. वरील सर्व कारणांमुळे मक्तेदार यांनी दि.२२ मार्च ते ३१ डिसेंबर २०२० पावेतो वसुली भरणा भरणेस पूर्णत: सुट मिळावी अशी विनंती केली आहे. तसेच मक्त्यातील १० टक्के वाढ ही दि.०१ जानेवारी २०२१ पासून लागू करावी तसेच पुढील सहा महिने करीता मक्ता वाढवून मिळावा अशी विनंती केलेली होती.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी जळगांव जिल्हयात कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी जिल्हाधिकारी यांचे दिनांक २१/०३/२०२० रोजी आदेशाव्नये आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणू संसर्ग बाधीत व्यक्ती आढळत असल्याने व अनेक प्रवासी भारतात व इतरत्र प्रवास करीत असल्याने संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात वाढ होऊ न देता उपाययोजना राबविणे आवश्यक असल्याने पुढील स्वरुपाचे आदेश पारीत करण्यात आले.

जळगांव जिल्हयातील सर्व हॉटेल्स, ढाबे, रिसॉर्ट, फार्म हाऊस, रेस्टॉरन्ट, खानावळी, लॉजींग, आईस्क्रिम पार्लर सर्व प्रकारच्या शितपेयांच्या गाडया व दुकाने (उदा.लिंबू सरबत, ऊसाचा रस, बर्फाचे गोळे, आईसकॅन्डी इ.तत्सम सर्व) तसेच सर्व प्रकारच्या खादयपदार्थांच्या गाडया (उदा.चहा, वडापाव, भाजी, ऑम्लेट, बिर्यानी, चायनिज, पाणीपुरी इ.तत्सम सर्व) सर्व प्रकारचे सोने चांदीचे दुकाने कापड ऑटोमोबाईल, भांडयाची दुकाने, इलेक्ट्रीक व ईलेक्ट्रानिक्स / टिंबर/हार्डवेअर/प्लाऊड, झेरॉक्स दुकाने, फोटो गॅलरी, लॉटरी सेंटर, मोबाईल रिपेअरींग व विक्री, सलून, ब्युटी पार्लर, फटाके, स्विटमार्ट, व्हिडीओ गेम, व्हिडीओ पार्लर, सायबर कॅफे, सहासी खेळाची ठिकाणे, वॉटरपार्क, कला केंद्र इत्यादी सर्व प्रकारची करमणूकीची व खेळाची केंद्रे आणि क्लब व तत्सम दुकाने बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित केलेले होते.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव यांनी कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये व तो नियंत्रणात रहावा यासाठी विविध आदेश वेळोवेळी पारीत केलेले होते. तद्नंतर जिल्हाधिकारी यांनी दिनांक २२ मार्च २०२० पासुन बंद असलेले दैनिक व साप्ताहीक बाजार दिनांक १५/१०/२०२० पासुन सुरु करण्याचे आदेशीत करण्यात आले. त्यामुळे एकंदरीत वरील काळात जळगांव शहरातील दैनिक बाजार, आठवडे बाजार, कोंबडी बाजार, इत्यादी येथील व्यवसाय मोठयाप्रमाणात प्रभावित झालेले होते. त्यामुळे तेथील उपस्थिती खूपच कमी प्रमाणात होती. तसेच हॉकर्स देखील कमी संख्येने व्यवसाय करताना आढळून आले. जळगांव शहरात नागरीकांना भाजीपाला व फळ मिळावेत यासाठी विशिष्ट ठिकाणी बाजार भरवण्याची परवानगी देण्यात आलेली होती. मात्र त्याठिकाणी देखील कमी प्रमाणात व्यावसायीक व्यवसाय करताना सर्व्हेमध्ये आढळून आले होते. जळगांव मनपा हद्दित एकूण १७०६ कोविड-१९ प्रतिबंधीत क्षेत्रे (कन्टेंन्टमेंट झोन) निश्चित करण्यात आलेले होते. सदरच्या प्रतिबंधीत क्षेत्रात कोणतेही व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आलेली होती. एकंदरीत कोरोना जागतीक महामारीचा अभूतपूर्व भयावह परिस्थीतीत मक्तेदारांकडून विक्रेते, हॉकर्स, आठवडे बाजार, दैनिक बाजार पूर्ण संख्येने कार्यरत नसताना हि निवेदेतील अटी शर्तीनुसार पूर्ण रकमेची वसुली करणे न्याय संगत ठरणार नाही. त्यामुळे लॉकडाऊन काळात वेळोवेळी करण्यात आलेल्या सर्व्हेनुसार विविध विक्रेते हॉकर्स (ज्यांचेकडून मक्तेदाराने वसुली करणे अपेक्षीत होते) यांच्या निश्चित करण्यात आलेल्या संख्येनुसार दैनिक बाजार फी मक्तेदाराकडून वसुली करणे योग्य होईल.

या बाबतीत करारनाम्यातील पृष्ठ क्रमांक ०४ वरील मुद्दा क्रमांक ०४ मधील अट क्रमांक ०६ नुसार करारनामा व निविदेबाबत वाद उद्भवल्यास आयुक्त जळगांव शहर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील असे नमूद आहे. त्यामुळे ही अट विचारात घेवून मक्तेदारास सर्व्हेनुसार उपस्थीती प्रमाणे शुल्काची रक्कम निश्चित करुन भरणा करणे योग्य राहील तसेच मक्तेदाराने दि.१६ ऑक्टोंबर २०२० पासून १० टक्के वाढीव मक्त्याप्रमाणे भरणा केलेला असल्याने. तसेच त्यांचेकडून सर्व्हेनुसार होणारी रक्कम रुपये

३२,५७,०००/- (अक्षरी बत्तीस लक्ष सत्तावन्न हजार मात्र) व प्रत्यक्ष मक्तेदाराने भरणा केलेली रक्कम रुपये १०,८३,०१४/- (अक्षरी दहा लक्ष त्र्याऐंशी हजार चौदा मात्र) यातील तफावतीची रक्कम रुपये २१,७३,९८६/- (एकविस लाख त्र्याहत्तर हजार नऊशे शहाऐंशी मात्र) मक्तेदार यांचेकडून भरुन घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच अर्जदार यांचे मागणी प्रमाणे सहा महिने मुदतवाढ देणे कररनाम्यानुसार योग्य होणार नसल्याने सदर मुदतवाढीची मागणी अमान्य करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**
**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

नगरसचिव:- विषय क्र. ३) जळगांव शहर महानगरपालिका आव्हाणे शिवार गट नं.८६४ या जागेवरील उच्चदाब ग्राहक क्र.११००१९००५०५० (मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.मुंबई) यांचेकडील थकबाकी रक्कम रु.११,०४,९५३.७५/- मात्र भरणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्तावाला मान्यता आहे. मान्य करण्यात यावा. परंतू आता दोन चार दिवसांपुर्वी मा.ना.पालकमंत्री महोदय यांच्या समक्ष महावितरणच्या अधिकाऱ्यांशी या विषयात चर्चा झाली होती. आणि त्या चर्चेच्या अनुषंगाने प्रशासनाने महावितरणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून याच्यामध्ये तडजोडीअंती काही रक्कम कमी होत असल्यास तश्या पध्दतीने आधी प्रयत्न करावे आणि तदनंतर हा भरणा करण्यात यावा.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :-** आणि सदरची जी रक्कम आहे ही नंतर ठेकेदाराकडुन वसुल करण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो तशी ही प्रशासनाला एक सुचना आहे की , या संदर्भात न्यायालयामध्ये ही जी रक्कम आपण भरू जी रक्कम आपण न्यायालयामध्ये भरू आपण त्या न्यायालयीन बाबीमध्ये आपल्याला मागणी करता येईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका आव्हाणे शिवार गट नं.८६४ या जागेवर ३० वर्ष कालावधी करिता बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर उभारणी करुन माहे जुन २०१० मध्ये प्रकल्प कार्यान्वीत करुन सदरचा प्रकल्प २ ते ३ वर्ष पावेतो सुरळीतपणे सुरु होता. मध्यंतरी प्रकल्पधारकाने म.न.पा.स कोणत्याही प्रकारची पुर्वसूचना न देता मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.मुंबई या नावाने असलेला प्रकल्प माहे जुन २०१३ मध्ये परस्पर बंद करुन निघून गेल्याने तत्कालीन आयुक्त तथा लवादक यांनी दि.०६/०२/२०१७ रोजी मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.मुंबई यांचेकडून रु.१०,५३,६९,६००/- नुकसान भरपाई वसूल करण्याचा निर्णय दिलेला आहे.

सदर कंपनीने लवादक यांचे निर्णयाविरुध्द जिल्हा सत्र न्यायालयात जळगांव येथे दावा दाखल केलेला आहे. सदर प्रकल्पधारक हे प्रकल्प बंद करुन निघून गेल्याने महावितरण वीज कंपनीमार्फत उच्चदाब विज (ग्रा.क्रं.११००१९००५०५०) कनेक्शन घेतलेले होते. महावितरण कंपनीचे दि.३०/१२/२०२० पत्रान्वये त्यांचे डिसेंबर २०२० पर्यंत रु.१५,५५,५३८/- पावेतो रक्कम थकबाकी असून One Time Settelment Scheme अंतर्गत अदा करावयाचे झाल्यास रु.११,०४,९५३.७५/- भरता येईल असे नमुद आहे.

तसेच आव्हाणे शिवार गट नं.८६४ या ठिकाणी नव्याने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे काम सुरु करणे प्रस्तावित असुन तेथे विज कनेक्शन आवश्यक आहे. तसेच मैला व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र (FSTP) उभारणी करण्यात आलेली असून विज कनेक्शन अभावी बंद आहे. जळगांव शहरातील गोळा करण्यात आलेल्या कचऱ्याचे वजन करणेसाठी नव्याने वजन काटा लावण्यात आलेला आहे. विज कनेक्शन अभावी बंद आहे.

तसेच सदर ठिकाणी प्रकल्प कार्यान्वीत करणेस उच्चदाबाचे विज कनेक्शनची आवश्यकता आहे. सदर ठिकाणी पुन्हा नविन प्रकल्प उभारणीसाठी विज कनेक्शनची मागणी केली असता महावितरण विज कंपनीकडून सदर जागेवर मागील थकबाकी असल्यामुळे नविन विज कनेक्शन देण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, जळगांव यांचेकडील पत्रानुसार थकबाकी रक्कम डिसेंबर २०२० पर्यंत रु.१५,५५,५३८/- पावेतो रक्कम थकबाकी असुन One Time Settelment Scheme अंतर्गत रक्कम रु.११,०४,९५३.७५/- किंवा सध्यस्थितीत असलेली थकबाकी रक्कम म.न.पा.फंडातून अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच मे.हजंर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.मुंबई

कंपनीसोबत जिल्हा सत्र न्यायालयात,जळगांव दाखल केलेल्या याचिकानुसार निर्णयानंतर सदरची रक्कम वसूल करुन पुन्हा म.न.पा. फंडात जमा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त रक्कम भरण्याच्या अगोदर महावितरण कंपनीशी One Time Settelment करतांना सदर रक्कमेमध्ये काही रक्कम कमी करता येत असल्यास ती करणेत यावी व त्यानूसार रक्कमेची अदायगी करणेत यावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

नगरसचिव:- विषय क्र. ४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(३) व २०(४) चे तरतुदीनुसार स्थायी समितीतुन ८ सदस्य निवृत्त करणेबाबत प्रशासनाकडुन अवलोकनार्थ आलेल्या प्रस्तावाची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** स्थायी समितीच्या सदस्यांना निवृत्त करण्याच्या प्रस्तावाची माहिती घेतली.

**मा.सभापती :-** अनुमोदन द्या.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०(३) व (४) च्या तरतुदीनुसार स्थायी समितीच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य प्रत्येक वर्षी निवृत्त करणे व त्यांच्या जागी नविन सदस्य नेमणुक करुन स्थायी समितीचे पुर्नगठन करणे अनिवार्य आहे.

अधिनियमाचे कलम २०(३) चे तरतुदीस अनुसरुन स्थायी समितीच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील.

स्थायी समितीचे गठनाचे ४ थे वर्ष असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(३) नुसार मुळ गठीत स्थायी समितीमधील आठ सदस्य हे कलम २० (४) चे तरतुदीनुसार त्यानतरच्या (वित्तीय वर्षानंतरच्या) पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळापर्यंत असतील ते निवृत्त होतील अशी तरतुद असल्यामुळे खालील नमुद केलेले स्थायी समिती सदस्य यांना दि.०१/१०/२०२१ रोजी दुपारी स्थायी समितीमधुन निवृत्त करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

स्थायी समितीमधुन निवृत्त होणाऱ्या सदस्यांचे नावे खालीलप्रमाणे आहे.

१) दारकुंडे नवनाथ विश्वनाथ
२) सोनवणे मुकूंदा भागवत
३) पाटील राजेंद्र झिपरु
४) देशमुख प्रतिभा गजानन
५) काळे रेश्मा कुंदन
६) लढ्ढा नितीन बालमुकूंद
७) बरडे नितीन मनोहर
८) शेख सैईदा युसुफ

वरील आठ सदस्य निवृत्त झालेनंतर त्यांचे जागेवर नविन आठ सदस्यांची नियुक्ती करणे संबंधात नियमाच्या तरतुदीस अनुसरुन विषय महासभेपुढे ठेवण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

नगरसचिव:- विषय क्र. ५) म.न.पा.तर्फे सार्व.बांधकाम विभागामार्फत खान्देश कन्या कवियित्री बहिणाबाई चौधरी सार्व.उदयानाच्या पुर्वेस नाविण्यपुर्ण योजना सन-२०१८-१९ अंतर्गत सार्व.शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. या संदर्भात जाहीर निविदा मागविण्यात याव्या. आणि ज्या काही जे कोणी योग्य पध्दतीने काम करेल त्यांना काम देण्यात यावे.

**मा .सभापती :-** अनुमोदन हवे . भाऊ अनुमोदन

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा .सभापती :-** पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, म.न.पा.तर्फे सार्व.बांधकाम विभागामार्फत खान्देश कन्या कवियित्री बहिणाबाई चौधरी सार्व.उदयानाच्या पुर्वेस नाविण्यपुर्ण योजना सन-२०१८-१९ अंतर्गत सार्व.शौचालय नव्याने बांधून तयार असून स्वच्छता युनिट प्रमुख प्रभाग क्रं.७ व मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सदर शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर देणे बाबत

खान्देश कन्या कवियित्री बहिणाबाई चौधरी सार्व.उदयानाच्या पुर्वेस शौचालय बांधलेले असून त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| | शौचालय सिट्स संख्या | मुतारी संख्या | स्नानगृह |
|---|---|---|---|
| पुरुष | ०१ | ०३ | ० |
| स्त्री | ०१ | ०२ | ० |
| एकूण - | ०२ | ०५ | ० |

वरील प्रमाणे शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर दिल्यास खालील निकषा प्रमाणे व अटी शर्तीस अधीन राहून देता येईल.

१. शौचालयाची देखभाल दुरुस्ती, रंग रंगोटी करुन सुस्थितीत ठेवून पैसे दया व वापरा (पे ॲण्ड युज) या तत्वावर किमान ५ वर्ष कालावधी करिता देता येईल.
२. सदर शौचालय वापरा करिता रु.५/- व मुतारी मोफत वापर करणे कामी सेवा शुल्काचे दर राहतील.
३. सदर शौचालय महिला व मुले १८ वर्षाखालील तसेच नादार बेघर असलेल्यांना मोफत असेल.
४. सदर शौचालय व मुताऱ्यांची रंग रंगोटी व दुरुस्ती देखभाल वेळोवेळी करावी लागेल.
५. शौचालयाची व मुताऱ्यांची साफ सफाई व जंतुनाशकांचा वापर दैनंदिन करावा लागेल.
६. शौचालय व मुताऱ्यांची साफ सफाई संदर्भात नागरीकांची किंवा सन्मा.सदस्यांची तक्रार प्राप्त झाल्यास मक्ता रद्द करण्यात येईल.
७. ज्या संस्थेस पे ॲण्ड युज तत्वावर देणेपुर्वी रु.५००/- च्या मुद्रांक पेपरावर करारनामा अटी शर्ती करुन दयावा लागेल.
८. पे ॲण्ड जुज वर शौचालय देणे करिता ५ वर्ष कालावधी करिता सुरक्षा ठेव म्हणून रु.१०,०००/- भरणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे अटी शर्ती नुसार पे ॲण्ड युज तत्वावर शौचालय व मुताऱ्या दिल्यास म.न.पा.चा त्यावर होणारा खर्च वाचेल व नागरीकांना चांगल्या प्रकारे सुविधा सुध्दा उपलब्ध होईल. तसेच हायवे लगतचा भाग असल्याने बाहेरगांवी जाणारे नागरीक इतरत्र ठिकाणी लघुशंकेस जाणार नाही.

खान्देश कन्या कवियित्री बहिणाबाई चौधरी सार्व.उदयानाच्या पुर्वेस नाविण्यपुर्ण योजना सन-२०१८-१९ अंतर्गत बांधलेले सार्व.शौचालय जाहीर देकार मागविणेत येवुन पे ॲण्ड युज तत्वावर देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

नगरसचिव:- विषय क्र. ६) नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१२ मधील अनुराग स्टेट बँक कॉलनी येथील पवन हिल ते धांडे नगर १२ मी डी.पी.रोड पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३०,३५,६३५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**नगरसचिव :-** या संदर्भात सन्मा.स्थायी समिती सदस्य श्री.नितीन मनोहर बरडे यांनी एक पत्र दिलेले आहे आणि त्याचे वाचन करणेबाबत सभागृहात वाचन करणेबाबत मा.सभापती यांचे निर्देश झालेले आहेत. त्यानुसार पत्राचे वाचन करण्यात येत आहे. या पत्राची प्रत यांना दिलेली आहे.

**सन्मा.स्थायी समिती सदस्य श्री.नितीन मनोहर बरडे यांचे पत्र पुढील प्रमाणे**
**पत्राचे वाचन करण्यात आले.**

प्रति,

१) मा.महापौर सो.,
२) मा.सभापती, स्थायी समिती,
३) मा.विरोधीपक्ष नेता,
४) मा.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

जिल्हा नियोजन मंडळाकडून मंजुर झालेले जळगांव शहरातील प्रभाग क्रं. १२ चे विकास कामाच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदा प्रक्रीया होऊन निविदा प्रक्रीया मंजूरी कामी स्थायी समिती समक्ष मंजूरीकामी संदर्भान्वये सादर आहे.

सदर निविदा प्रक्रीया ही अत्यंत बेकायदेशीर पध्दतीने राबविण्यात येऊन मे.जिल्हाधिकारी सोा , ह्यांचेकडील क्रं. नप/नियोजन/आरआर/६७९/२०२१ दिनांक. १२/०५/२०२१ अन्वयेच्या प्रशासकीय मान्यते मधील काही शर्तीचा भंग करून निविदा अटीचा भंग करून कोणतीही छाननी न करता सर्व निविदेस तांत्रिक मान्यता दिली असल्याचे दिसून येत आहे.

१) प्रशासकीय मान्यता मधील अटी व शर्ती मधी क्रं. १५ अन्वये शासनाची मार्गदर्शक तत्वे , मापदंड व निकष यांचे कटाक्षाने पालन होईल याची दक्षता घ्यावी याबाबत अनियमीतता आढल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात येऊन पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. सदर स्पष्ट तरतूद असतांना ह्यांचा भंग करण्यात आल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

म्हणजेच शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे निविदा प्रक्रीयेबाबतीत मार्गदर्शक तत्वे जाहीर केलेली आहे. त्यांचा कोणताही अवलंब प्रशासनाकडून करणेस आलेला नाही हे निविदा पाहता स्पष्ट होत आहे. सबब सदर निविदा प्रक्रीया रद्द होणेस पात्र आहे.

२) मे.जिल्हाधिकारी ह्यांचे प्रशासकीय मान्यते मधील अट क्रं. २ नुसार अंदाजपत्रकामध्ये नमूद असलेल्या Ready Mix Cement Concrete मधे जे काम करणेबाबत नमूद आहे अशी कामे Fully Automatic Micro Processor Based PLC With Scada Enable Reversible Drum Type Mixer etc . द्वारेच करणे बंधनकारक राहील.

असे स्पष्ट नमूद असतांना ह्या अटीचा अंतर्भाव कोणत्याही निविदा धारकाने आपल्या सादर केलेल्या निविदेमध्ये List Of Matchinery म्हणून जोडलेला नाही. ही वस्तुस्थिती आहे , म्हणून सदर निविदा रद्द होणेस पात्र आहे.

३) सदर वरील नमूद काम हे कॉंक्रींट रस्त्याचे असून निविदे संचासोबत जोडलेल्या शेड्युल B चे तक्तानुसार कामे करणेसाठी आवश्यक मशिनरी यशस्वी निविदाधारकाकडे नाहीच तसेच इतर ही निविदा धारकांकडे सुध्दा नाही म्हणजेच तांत्रिक लिफाफा उघडतांनाच अपात्र होऊन बाद होणे आवश्यक असतांनाच त्यांना पात्र करण्यात आल्या आहे. ही बाब एक प्रकारे बेकादेशीर सदरात मोडते म्हणून निविदा रद्द करणेस याव्यात.

४) सदर निविदे प्रक्रीयेमध्ये एकुण ५ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये प्रथम निम्नतम निविदा श्री. सुरज विजय नारखेडे , द्वितीय निम्ततम निविदा श्री. चेतनकुमार नगिनचंद चौधरी , तृतीय निम्नतम निविदा श्री. देवेंद्र तायडे ह्यांच्या निविदा खालील कारणामुळे अपात्र होत आहे. तरी सदर निविदा रद्द होणेस पात्र आहेत.

४.१) निविदा प्रक्रीया मान्यतेमधील लिफाफा क्रं. १ चे अट क्रं. ६ मध्ये कामास लागणारी मशिनरी ही स्वमालकीची असणे आवश्यक आहे म्हणून अपात्र आहेत. परंतु सदर निविदा भरलेल्यांनी भाडे करारनामा जोडलेला असून तो कालबाह्य झालेला आहे व प्रथम निम्नतम व द्वितीय निम्नतम ह्यांनी एकाच मशिनरी मालकाकडून त्याची मशिनरी भाड्याने घेतल्याचा करारनामा जोडला आहे. तसेच तृतीय निम्नतम ह्यानी कोणतीही भाडेकरार अथवा बिले जोडले नाही.

४.२) निविदा प्रक्रीया मान्यते मधील Additional Condition Of Work मधील अट क्रं. ५ नुसार मशिनरी व सेंट्रींग मटेरीयल यांचे कागदपत्र जोडलेले नाही.

४.३) निविदा प्रक्रीया मान्यते मधील Additional Condition Of Work मधील Declaration पाचही निविदा धारकांनी जोडलेले नाही.

४.४) सदर काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मशिनरी खालील प्रमाणे

-Power Roller 8 to 10 MT

- Paver With Electric Sensor

- Vibrator Roller

- Grove Citting Machine

इत्यादी मशिनरी एकाही निविदा धारकाकडे नाही ही वस्तुस्थिती आहे.

५) प्रथम निम्नतम ह्यांने अगोदर आमचे प्रभागात अंदाजे १ कोटीची वर्कऑर्डर ३ महिने पुर्वी घेतली आहे मात्र काम अद्याप सुरू केलेले नाही.

६) म्हणजेच पाच निविदा धारक हे काम करणेस सक्षम नाही बाब स्पष्ट होत आहे.

७) कोणतीही पात्रता नसतांना तांत्रिक लिफाफा वेळी अपात्र होणे वरील कारणांमुळे व नियमाने अपात्र होणे आवश्यक असतांना प्रशासनाने त्यांना काम मिळविणेचे दृष्टीने चुकीची छाननी केलेली आहे. त्यामुळे मे. जिल्हाधिकारी ह्यांची प्रशासकीय दृष्टीने मान्यतेचा भंग होत आहे. तसेच निविदा अटीशर्तींचा भंग होत आहे.

सबब सदर निविदा धारक अपात्र ठरत असल्याने रद्द करणेत येऊन नव्याने निविदा प्रक्रीया तातडीने पार पाडाव्या व भविष्यात अशा चुका प्रशासनाने करू नये . अशी ताकीद देणेत यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.सभापती महोदय , निश्चितपणे या गंभीर अश्या त्रुटी या संपुर्ण निविदा प्रक्रीयेमध्ये राहीलेल्या दिसुन येतात. एकीकडे राज्य शासन म्हणा किंवा जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातुन ज्या वेळेला कोट्यवधी रूपयांचा निधी महानगरपालिकेला प्राप्त होत असतो आणि त्याच्या संदर्भात निविदा प्रक्रीया ही अत्यंत पारदर्शक आणि कायदेशीर दृष्टया योग्य अशा पध्दतीने पाळणे हे अपेक्षित असते. परंतू सन्मा सदस्य नितीन बरडे यांनी ज्या काही गोष्टी त्रुटी निदर्शनास आणुन दिलेल्या आहे. या अत्यंत गंभीर अश्या स्वरूपाच्या त्रुटी आहेत आणि या संपुर्ण त्रुटी पाहाता . या मधील विषय क्रं. ६ ,७, ८ आणि ९ असे चारही विषय हे नियोजन मंडळाच्या मिळालेल्या निधीच्या अनुषंगाने आणि मा. जिल्हाधिकारी महोदय यांनी ज्या काही अटी शर्ती प्रस्तावित केलेल्या आहेत. त्या अटी शर्तींची अतिशय त्यांची अत्यंत काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नसल्याकारणाने या संपुर्ण निविदा प्रक्रीया रद्द करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ज्या अटी शर्ती असतील त्या नियमांच अत्यंत काटेकोरपणे पालन करून तातडीने या फेर निविदा प्रसिध्द करण्याच्या संदर्भात प्रशासनाने या गोष्टींची दखल घ्यावी आणि प्रत्येक निविदा ही एकत्रितरित्या त्या त्या प्रभागाची प्रत्येक निविदा ही एकत्रितरित्या निविदा प्रक्रीया ही राबवावी.

**श्री.नितीन बरडे :-** माझे मनुमोदन आहे.

**मा. सभापती :-** सदरच पत्र जे आहे. आवाज येतोय माझा

**श्री.नितीन बरडे :-** हो येतोय.

**मा. सभापती :-** सदर पत्र मला अर्ध्या तासापुर्वी मिळालेले आहे. याची संबंधित विभाग प्रमुखांकडुन माहिती घेणे शक्य नव्हते म्हणुन आणि आपण बघतो आहे जे सुरज राजे नारखेडे यांची निविदा म्हणजे यांचे निविदा मंजुर झालेली आहे आणि ती जवळ जवळ ९.१० टक्के कमीने झालेली आहे. जर आपण आता नविन निविदा प्रक्रीया राबवायची म्हंटली तर आणि जर का समजा इतक्या बिलोमध्ये जर का निविदा भरली गेली नाही. तर मनपाचे नुकसान होणार आहे. मग याला जबाबदार कोण ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रश्न बिलोचा किंवा अबोचा नाही सभापती महोदय, प्रश्न हा निविदा प्रक्रियाच्या अटीशर्ती ह्या कुठेतरी डावलण्यात आलेल्या आहे. कायदेशीर प्रक्रियेचा पारदर्शकरित्या अटी शर्तींचा अवलंब करण्यात आलेला नाही. भविष्यात योग्य पध्दतीने राबविलेली नसल्यास त्याचा सुध्दा ठपका या सभागृहावर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तातडीने या अटी-शर्तींची योग्य पध्दतीने पुर्तता होणार नसणार तर या निविदा प्रक्रीया रद्द करून नव्याने निविदा प्रक्रीया राबविणे हे कायदेशीर दृष्टया संयुक्तीक होईल.

**मा. सभापती :-** अटी शर्तीमुळे महापालिकेचे नुकसान होणार आहे की, निविदा प्रक्रीया नविन राबविल्यामुळे आपले नुकसान होणार आहे याचा ही विचार केला गेला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रश्न नुकसानीचा नाहीये. या ज्या निविदा प्रक्रीया कायदेशीर दृष्टया योग्य नसेल आणि अश्या बेकायदेशीर प्रक्रीयेचा अवलंब करण्याच्या दृष्टीकोनातुन हे सभागृह प्रयत्न करत असेल किंवा मला वाटते की ते कायदेशीररित्या योग्य नाहीये.

**श्री.नितीन बरडे :-** प्रक्रिया चुकीची झाली ना राजुभाऊ

**मा. सभापती :-** झालीय ना.

**श्री.नितीन बरडे :-** ऐका ना परवा मामांनी एक फोटो टाकला होता रस्ते खराब असलेचा, सगळी निविदा प्रक्रीया पुर्णपणे झालेली नसल्याने सुध्दा रस्ते खराब होत चालले आहे. आपण स्टेट बँक ते आर.आर.शाळा बघा. काम झालेले आहे पण रस्त्याला अजुन ही एक एक फुट खड्डा आहे कारण आपली प्रक्रीया चुकते आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ हे म्हणताहेत की हे जे टेंडर जे आहे , हॅलो.

**मा. सभापती :-** भाऊ हा जो विषय आहे कामाच्या गुणवत्तेबद्दल बोलताय आपण की , प्रक्रीयेच्या विषयी बोलताय.

**श्री.नितीन बरडे :-** राजुभाऊ प्रक्रियेपासुनच चुक होते ना आपली.

**मा. सभापती :-** यासाठी आपण बोलत आहात तर हा विषय आजच्या सभेत तहकुब ठेवुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ ऐकून घ्या ना. तहकुब नाही करायचा, रद्द करायचे आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ मी काय म्हणतोय साफसफाई च्या संदर्भात जो निर्णय यांनी घेतला होता. ते काम असेच झाले आहे का की पैसे देवुन केले आहे त्यांनी आणि आता येथे नुकसान होते आहे हे लक्षात आले का ? तर या निविदा हे का रद्द करत नाहीये. तर मग हे कस काय रद्द करत नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही तसे नाहीये नवनाथभाऊ ऐका ना सन्मा. भारतीय जनता पक्षाच्या संदस्यांना जर आक्षेप असेल तर बहुमताने रद्द करण्यात यावा.

**मा. सभापती :-** ठिक आहे बहुमताने रद्द करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हे बहुमताने रद्द करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने आता ही निविदा प्रक्रीया राबवितांना संपुर्ण नियमानुसार व योग्य पध्दतीने अभ्यास करुन काटेकोरपणे पारदर्शक पध्दतीने ही निविदा प्रक्रीया राबवावी. कायदेशीर निविदा प्रक्रीया राबविणे योग्य होईल आणि याच्यापुढे निविदा प्रक्रीया राबवितांना आणि तातडीने हा ठराव झाल्यानंतर तीन दिवसाच्या आत नव्याने या निविदे प्रक्रीयेचा विकास कामांचे एकत्रिकरण करून एकत्रितरित्या ही निविदा प्रक्रीयेची प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी करावी.

**नगरसचिव:- विषय क्रं**

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**नगरसचिव:-** सन्मा सभागृह विषय क्रं. ६,७,८,९ चारही विषय आहेत का ते ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो चारही विषय आहेत.

**नगरसचिव:-** याच्यात बहुमताने मंजुर करायचा आहे का हे विषय ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो, हो

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती:-** बोला ताई उज्वलाताई बोला

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, नितीनभाऊ म्हणताहेत की हे ज्या निविदा प्रक्रीया चुकीच्या पध्दतीने झालेल्या आहेत. तर मग याला जबाबदार प्रशासन आहे. तर मग वेळोवेळी प्रशासन असं का बोलत असते की मुळ मुद्दा हाच असतो . प्रत्येक वेळेला आपल्या सर्व सन्मा . सदस्यांचा मुळ मुद्दा हाच असतो . वारंवार आपण हेच मांडत असतो की प्रशासन हे चुकीचे कामं याला जबाबदार कोण ?

**मा.सभापती:-** ताई प्रशासनाकडुन खुलासा घेवु.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो बोला.

**श्री.नितीन बरडे :-** ताई आपण वारंवार जर अस होत असेल तर

**सौ.उज्वला बेंडाळे :-** वारंवार जर अस होत असेल तर

**श्री. नितीन बरडे** :- ताई आता आपले १ कोटीचे टेन्डर झालेले आहे. वर्कऑर्डर झालेली आहे १ कोटीची. हाच ठेकेदार आहे २ महिन्यापुर्वी झालेली आहे प्रक्रिया. आठवत आहे का तुम्हाला, स्टेट बँक कॉलनीचाच रस्ता आहे. १२ मिटर.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो आठवत आहे भाऊ.

**श्री.नितीन बरडे :-** ताई अजुनही काम सुरू होत नाहीये ना आपलं.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नाही झाले अजुनही

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई , सभापती महोदय या संपुर्ण प्रक्रीयेमध्ये ज्या गोष्टी आपल्या निदर्शनास आल्या की ज्या मक्तेदाराचे आर्थिक क्षमता नसते. तो सुध्दा अश्या प्रकारच्या निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेवुन घेतात. कमी दराने कामे मिळवुन घेतात. परंतू वर्षानुवर्षे ते कामे मार्गी लागत नाहीत. पर्यायाने नागरीकांच्या रोषाला हा व सन्मा.सदस्यांना आणि महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांना रोषाला तोंड द्याव लागत. तर ज्यावेळेला ज्या मक्तेदाराची आर्थिक क्षमता चांगली असेल. ज्याचा एक गुडविल असेल. तर कुणी स्वस्त काम करतोय परंतू कामाची गुणवत्ता जर निकृष्ट पध्दतीची असेल. तर मग अशा पध्दतीचे निकृष्ट काम आपण करून घ्यायचे का ? त्यामुळे काम करतांना निवडतांना आपण त्या एजन्सीची निवड करावी की काम हे उत्कृष्ट दर्जाचे होणे गरजेचे असते. कारण कामाची गुणवत्ता चांगली असायला पाहीजे. म्हणुन या निविदा अटी शर्तीच्या योग्य पध्दतीने व्हायला पाहीजे.

**मा.सभापती:-** भाऊ आपण हा विषय तहकुब ठेवायचे म्हणतोय. आपण आठ दिवसामध्ये सभा काढुन आपण त्यावेळेस निर्णय घेवु.

**श्री.नितीन बरडे :-** भाऊ तहकुब नाही डायरेक्ट रद्द करायचे.

**मा.सभापती:-** नितीनभाऊ आठ दिवसांनी आपण निर्णय घेता येईल

**श्री.नितीन बरडे :-** भाऊ तहकुब करायचे नाही . त्याच्यामुळे कामाची क्वालिटी भेटणार नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तहकुब नाही करायचे रद्द करा ते विषय

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, हे विषय बहुमताने रद्द करण्यात यावे.

**मा.सभापती:-** ठिक आहे बहुमताने मंजुर करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे.

**नगरसचिव :-** विषय क्रं. ६,७,८,९ हे सन्मा.स्थायी समिती सभागृहाने बहुमताने मंजुर केलेले आहेत. या संदर्भात विषय क्रं. ८ व ९ संदर्भात सन्मा.स्थायी समिती सदस्य .श्री.प्रशांत सुरेश नाईक यांचा सुध्दा अर्ज प्राप्त झालेला आहे. मा. सभापती महोदय यांनी वाचन करणेबाबत तसे आदेशित केलेले आहे.निविदा प्रक्रीया रद्द करणेबाबतचा अर्ज आहे हा.

**सन्मा.सदस्य स्थायी समिती श्री. प्रशांत नाईक यांचे पत्राचे खालील प्रमाणे वाचन करण्यात आले**

जिल्हा नियोजन मंडळाकडून मंजुर झालेले जळगांव शहरातील प्रभाग क्रं. १५ चे विकास कामाच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदा प्रक्रीया होऊन निविदा प्रक्रीया मंजूरी कामी स्थायी समिती समक्ष मंजूरीकामी संदर्भान्वये सादर आहे.

सदर निविदा प्रक्रीया ही अत्यंत बेकायदेशीर पध्दतीने राबविण्यात येऊन मे.जिल्हाधिकारी सो॥ , ह्यांचेकडील क्रं. नप/नियोजन/आरआर/६७९/२०२१ दिनांक. १२/०५/२०२१ अन्वयेच्या प्रशासकीय मान्यते मधील काही शर्तीचा भंग करून निविदा अटीचा भंग करून कोणतीही छाननी न करता सर्व निविदेस तांत्रिक मान्यता दिली असल्याचे दिसून येत आहे.

१) प्रशासकीय मान्यता मधील अटी व शर्ती मधी क्रं. १५ अन्वये शासनाची मार्गदर्शक तत्वे , मापदंड व निकष यांचे कटाक्षाने पालन होईल याची दक्षता घ्यावी याबाबत अनियमीतता आढल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात येऊन पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. सदर स्पष्ट तरतूद असतांना ह्यांचा भंग करण्यात आल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

म्हणजेच शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे निविदा प्रक्रीयेबाबतीत मार्गदर्शक तत्वे जाहीर केलेली आहे. त्यांचा कोणताही अवलंब प्रशासनाकडून करण्यात आलेला नाही हे निविदा पाहता स्पष्ट होत आहे. सबब सदर निविदा प्रक्रीया रद्द होणेस पात्र आहे.

२) मे.जिल्हाधिकारी ह्यांचे प्रशासकीय मान्यते मधील अट क्रं. २ नुसार अंदाजपत्रकामध्ये नमूद असलेल्या Ready Mix Cement Concrete मधे जे काम करणेबाबत नमूद आहे अशी कामे Fully Automatic Micro Processor Based PLC With Scada Enable Reversible Drum Type Mixer etc . द्वारेच करणे बंधनकारक राहील.

असे स्पष्ट नमूद असतांना ह्या अटीचा अंतर्भाव कोणत्याही निविदा धारकाने आपल्या सादर केलेल्या निविदेमध्ये List Of Matchinery म्हणून जोडलेला नाही. ही वस्तुस्थिती आहे, म्हणून सदर निविदा रद्द होणेस पात्र आहे.

३) सदर वरील नमूद काम हे कॉंक्रींट रस्त्याचे असून निविदे संचासोबत जोडलेल्या शेड्युल B चे तक्तानुसार कामे करणेसाठी आवश्यक मशिनरी यशस्वी निविदाधारकाकडे नाहीच तसेच इतर ही निविदा धारकांकडे सुध्दा

नाही म्हणजेच तांत्रिक लिफाफा उघडतांनाच अपात्र होऊन बाद होणे आवश्यक असतांनाच त्यांना पात्र करण्यात आल्या आहे. ही बाब एक प्रकारे बेकादेशीर सदरात मोडते म्हणून निविदा रद्द करणेस याव्यात.

४) सदर निविदे प्रक्रीयेमध्ये एकूण २ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये प्रथम निम्नतम निविदा श्री. हार्दीक प्रकाश पटेल , द्वितीय निम्ततम निविदा श्रीश्री इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली ,जळगांव ह्यांच्या निविदा खालील कारणामुळे अपात्र होत आहे. तरी सदर निविदा रद्द होणेस पात्र आहेत.

४.१) निविदा प्रक्रीया मान्यतेमधील लिफाफा क्रं. १ चे अट क्रं. ६ मध्ये कामास लागणारी मशिनरी ही स्वमालकीची असणे आवश्यक आहे म्हणून अपात्र आहेत. परंतु सदर निविदा भरलेल्यांनी भाडे करारनामा जोडलेला असून तो कालबाह्य झालेला आहे तसेच भाडेकरारनामा हा फक्त शेंदुर्णी कामासाठी असून तो ह्यास ग्राह्य धरता येणार नाही . तसेच श्री.नरेश सोनवणे ह्यांनी करून दिलेला भाडेकरारनामा त्याची मुदत ६ जानेवारी २०२१ रोजी संपुष्टात आली आहे ही वस्तुस्थिती आहे.

४.२) निविदा प्रक्रीया मान्यते मधील Additional Condition Of Work मधील अट क्रं. ५ नुसार मशिनरी व सेंट्रींग मटेरीयल यांचे कागदपत्र जोडलेले नाही.

४.३) निविदा प्रक्रीया मान्यते मधील Additional Condition Of Work मधील Declaration दोनही निविदा धारकांनी जोडलेले नाही.

५) म्हणजेच पाच निविदा धारक हे काम करणेस सक्षम नाही बाब स्पष्ट होत आहे.

६) कोणतीही पात्रता नसतांना तांत्रिक लिफाफा वेळी अपात्र होणे वरील कारणांमुळे व नियमाने अपात्र होणे आवश्यक असतांना प्रशासनाने त्यांना काम मिळविणेचे दृष्टीने चुकीची छाननी केली .त्यामुळे मे. जिल्हाधिकारी ह्यांची प्रशासकीय दृष्टीने मान्यतेचा भंग होत आहे.

सबब सदर निविदा धारक अपात्र ठरत असल्याने रद्द करणेत येऊन नव्याने निविदा प्रक्रीया तातडीने पार पाडाव्या व भविष्यात अशा चुका प्रशासनाने करू नये . अशी ताकीद देणेत यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही साहेब या निविदे प्रक्रीये संदर्भात प्रशांतभाऊ यांची पण तीच तक्रार आहे आणि त्या पत्राची सुध्दा याची नोंद घेण्यात यावी. कारण ही निविदा प्रक्रीया जी आहे ती चुकीच्या पध्दतीने राबविलली गेलेली आहे. तशी नोंद घेण्यात यावी.

**मा.सभापती:-** नोंद घेण्यात यावी.

**सौ.ज्योती चव्हाण :-** नितीनभाऊ, सभापती महोदय,

**मा.सभापती:-** हो बोला ताई.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**मा.सभापती:-** हो बोला , बोला .

**सौ.ज्योती चव्हाण :-** प्रशासनाकडे ५-७ लाखाचा एक बिल थकीत आहे. त्याची अजुनही कार्यपुर्ती होत नाहीये. मी सहा महिने झाले फिरतेय पण तरी सुध्दा काम होत नाहीये. इतकी दिरंगाई जर प्रशासनाची चालु असेल तर कामे कशी करायची आपण वर्क ऑर्डरची प्रासेसच जात नाहीये अजुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई तुमचे नावच ज्योतीताई आहे. ज्योती म्हणजे ज्वाला आणि एकदा त्या ज्वालाचे चटके लागु द्या प्रशासनाला.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मला तरी ते वाटायला लागले आहे आता, तिच वेळ आलेली आहे. प्रशासनाचा कारभार एकदम धिम्म झाले म्हणजे सहा महिन्यापर्यंत आपण बोलत नाही तोपर्यंत चालु आहे. कोण काय बोलत काय नाही धकतय असे हे काम होणार आहे आणि हे काम होणार आहे की नाही होणार आहे असं वाटायला लागलय मला आता.

**मा.सभापती:-** कुठला विषय आहे ताई.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई सर्व

**सौ.ज्योती चव्हाण :-** हा आमदार फंडातील बेंचच काम आहे माझे जवळजवळ सहा महिन्यांपासुन फिरतेय मी अजुनही काही वर्कऑर्डर पर्यंत येत नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुमच्या कडून हे अपेक्षित नाहीये राजुभाऊ, तुमच्या राज्यात हे अपेक्षित नाहीये.

**मा.सभापती:-** भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्ही सक्षम सभापती आहात.

**मा.सभापती:-** राज्य आपल आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही राजुभाऊ आपण या सभागृहात सभापती असल्याकारणाने आम्ही या सभागृहात सभापती नसल्याकारणाने,

**मा.सभापती:-** भाऊ राज्य हे आपल आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आम्ही तुमच्या छोटेखानी राज्यामध्ये तुमच्या हाताखाली आहोत आम्ही.

**मा.सभापती:-** भाऊ केंद्र तर तुमच्याकडे आहे ना भाऊ आणि राज्य तर माझ्याकडे देऊन ठेवले आहे. केंद्र तर तुमच्याकडे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही , परंतू प्रशासनाच्या अश्या पध्दतीने सदस्यांच्या नाराज्या होतात. प्रशासनाने अश्याप्रकारे

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ माझ्या वॉर्डामधील कामाची वर्कऑर्डर देवुन रस्ते खोदुन ठेवलेले आहे. अजुन पर्यंत काम चालु झाले नाही कॉँक्रीटचे.

**मा.सभापती:-** नवनाथभाऊ हे विषय मार्गी लावले आहे आता कोणाकडे आहे साहेब ज्योतीताईंचा विषय.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** मा.सभापती , सन्मा. सभागृह बेंचेसच्या प्रकरणामध्ये मुख्यलेखापरिक्षक यांनी बेंचेसच्या दराबाबत एक मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यानंतर मा.आयुक्त साहेबांसोबत मिटींग ठेवली होती. ती आज मिटींग होणार होती पण साहेब नसल्यामुळे ती मिटींग साहेब आल्यानंतर होणार आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हे असच चाललेले आहे. सहा महिने झाले आता या गोष्टीला जबाबदार कोण? मला अस वाटत आहे की आपण हे विचारालेच नाहीये कोणत्या अधिकाऱ्याला इतका कंटाळा आलेला आहे या गोष्टींचा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** भोसलेसाहेब आपण आपले कनिष्ठ अभियंता यांना मदतीला कोणाला तरी घ्या त्यांना आपण आपल्यासोबत ठेवा. कारण की आता विकास कामांचे हे प्रस्ताव मोठ्या संख्येने येत असतील. मी समजु शकतो तुमच्या एकट्यावर ताण पडत असेल. परंतू या विषयांच्या पुर्ण होण्याच्या दृष्टीकोनातुन आपण नगरसेवकांना आपण प्रशासकीय अडचणी येत असेल तर तशी आयुक्त साहेबांशी चर्चा करून

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** - भाऊ पाणी पुरवठ्यामधुन अभियंते काढता येत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही याच्या संदर्भात तुम्हाला योगेश वाणी पाहीजे आहे ना

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** - योगेश वाणी कडे पण तिकडचा लोड भरपुर आहे . याबद्दल आपली चर्चा झाली होती भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही मा. सभापती महोदय आपण काय करू की अतिक्रमण

**मा.सभापती :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** अतिक्रमण विभागात आपण ईस्माईल शेख यांना दिलेले आहे. तर ईस्माईल शेख यांना पाणी पुरवठ्यात पाठवु आणि तसेच पाणीपुरवठा विभागाचे योगेश वाणी जे आहेत तर योगेश वाणींना भोसले साहेबांच्या मदतीला घेवुन आणि अतिक्रमण अधिक्षक म्हणुन बडगुजर म्हणा किंवा जो कोणी सक्षम असा दुसरा कुणी असेल प्रशासकीय रित्या तश्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. आणि असे केल्यावरच या विकासकामांना कुठे गती येईल. अन्यथा काय होईल आपण अशाप्रकारे प्रत्येक मिटींगमध्ये पोटतिडकीने चर्चा करतो. प्रशासन त्यांच्याजागी हतबल आहे आणि आपण आपल्याजागी हतबल आहेत आणि हतबलते मुळे नागरीकांचा रोष ओढवतो.

**मा.सभापती :-** भाऊ या विषयामध्ये आपण आयुक्त साहेब आल्यानंतर त्यांच्या कॅबिनमध्ये जावुन चर्चा करून निर्णय घेवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय ,

**मा.सभापती :-** हो भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय, माझ्या वॉर्डामधील पण विषय असाच आहे . जवळजवळ आज अडीच ते तिन महिने झाले वर्कऑर्डर देवुन तो ठेकेदार अजुन काम करत नाहीये. तिसऱ्या माणसाने त्याच्या नावावर काम घेतलेले आहे. त्याला फक्त नोटीसवर नोटीस देताहेत . तो उत्तर देत नाहीये काय चालु आहे मला काही समजत नाहीये. महापौर उपमहापौर यांनी उदघाटन केलेले आहे त्या विषयावर कठोर निर्णय घ्या काहीतरी त्याचा नाहीतर काम तरी रद्द करा नाहीतर दोन चार दिवसांत काम करा.

**मा.सभापती :-** भाऊ ठिक आहे , ठिक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे. भोसले साहेब अशाप्रकारच्या कामांचे कार्यादेश देवुन बऱ्याचश्या ज्या एजन्सीज या काम करीत नाहीत. या मक्तेदारांची कुठलीही हयगय न करता यांना मी म्हणतो की सरळ ब्लॅकलिस्टेड करा. कारण अशा विषयांमुळे सन्मा.सदस्यांना रोज मनस्ताप सहन करावा लागतो वॉर्डात जावुन आणि मक्तेदार वेगवेगळ्या

योजनांचे काम घेवुन सातत्याने मुर्ख बनविण्याचे काम करतो. तर याची गंभीरतेने दखल घ्या आणि अशाप्रकारचे जे मक्तेदार असतील. त्या मक्तेदारांची सुची तयार करून त्यांना सक्त ताकीद देवुन आणि जर कधी तरीही त्यांच्या कामामध्ये सुधारणा होत नसेल. तर निश्चितपणे त्यांना काळ्या सुचीमध्ये टाकण्याच्या संदर्भातील प्रयत्न करावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ त्याला चार नोटीसा दिल्या आहेत. तरीही ऐकत नाहीये तो

**श्री.नितीन बरडे :-** भाऊ माझ्या वॉर्डात पण काम दिलेले तिन महिने झालेले आहे ९६ लाखाचे अजुनही काम सुरू होत नाहीये. कॉंक्रींटचे काम करायचे आहे. महत्वाचे करता आणि हे काम नाही करत.

**नगरसचिव :- ५**

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता:-** नोटीस दिली आहे भाऊ त्याला तशी

**श्री.नितीन बरडे :-** महत्वाचे रस्ते आहेत ते मोठा रस्ता आहे डिपी रस्ता आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे असे ठेकेदार आहेत ना यांना कुठल्याही प्रकारची मुदतवाढी देण्यात येवु नये. वेळप्रसंगी यांचे आलेले बिल सुध्दा रोखुन ठेवण्यात यावे. म्हणजे यांची आर्थिक क्षमता नसतांना असे काम घेवुन ठेवतात आणि मग आता बिल मिळेल आणि मग बिल मिळाल्यानंतर मी कामाला सुरूवात करेल. ही पध्दत चुकीची आहे. निविदा भरतांना आपली आर्थिक क्षमतेचा मक्तेदाराने तपासुनच किंवा विचार करून त्याच्यामध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे. परंतू महानगरपालिके कडून बिल मिळायला उशिर झाला तर मग मक्तेदार काम थांबवुन ठेवतो. ही जी पध्दत आहे ती योग्य नाहीये. तर अशांची आलेली बिल ही सुध्दा अदायगी करण्यात येवु नये आणि याच्यापुढे सुध्दा पुढील निविदा व मुदतवाढी देण्यात येवु नये.

**मा.सभापती:-** हो ठिक आहे.

**सौ.ज्योती चव्हाण:-** सभापती महोदय,

**मा.सभापती:-** हो बोला ताई

**सौ.ज्योती चव्हाण:-** त्या कामाच्या वर्कऑर्डरच्या सुचना द्या तुम्ही तशा अधिकाऱ्यांना

**मा.सभापती:-** ताई आपण आयुक्त साहेबांकडे जावुन भेटु आणि त्याच्यावर निर्णय घेवु.

**सौ.ज्योती चव्हाण:-** ओके.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१२ मधील अनुराग स्टेट बँक कॉलनी येथील पवन हिल ते धांडे नगर १२ मी डी.पी.रोड पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी राबविलेली निविदा प्रक्रिया ही कायदेशिर नसल्याने प्रशासनाकडून आलेला सदरचा प्रस्ताव (निविदा प्रक्रिया) रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त कामी शासनाचे सार्व.बांधकाम विभागाचे निविदा प्रक्रियेच्या बाबतीत असलेल्या मार्गदर्शक तत्वानूसार तसेच अटी-शर्तीनूसार नविन निविदा प्रक्रिया ३ दिवसात राबवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- १० प्रतिकुल मते :- ०३**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

नगरसचिव:- विषय क्र. ७) नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१९ मध्ये सर्व्हे नं.१६७/१ व १६७/२ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे व कल्व्हेट टाकणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२५,३६,४७६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१९ मध्ये सर्व्हे नं.१६७/१ व १६७/२ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे व कल्व्हेट टाकणे कामी राबविलेली निविदा प्रक्रिया ही कायदेशिर नसल्याने प्रशासनाकडून आलेला सदरचा प्रस्ताव (निविदा प्रक्रिया) रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त कामी शासनाचे सार्व.बांधकाम विभागाचे निविदा प्रक्रियेच्या बाबतीत असलेल्या मार्गदर्शक तत्वानूसार तसेच अटी-शर्तीनूसार नविन निविदा प्रक्रिया ३ दिवसात राबवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- १०  प्रतिकुल मते :- ०३**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

नगरसचिव:- विषय क्र. ८) नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१५ मध्ये मेहरुण अंतर्गत कुंभार वाडा सार्वजनिक शौचालय ते त्रिवेणी माता मंदिरापर्यंत नाल्याच्या भागास संरक्षण भिंत बांधणे कामी येणारा एकूण रक्कम रु.४५,३१,५८०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१५ मध्ये मेहरुण अंतर्गत कुंभार वाडा सार्वजनिक शौचालय ते त्रिवेणी माता मंदिरापर्यंत नाल्याच्या भागास संरक्षण भिंत बांधणे कामी राबविलेली निविदा प्रक्रिया ही कायदेशिर नसल्याने प्रशासनाकडून आलेला सदरचा प्रस्ताव (निविदा प्रक्रिया) रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त कामी शासनाचे सार्व.बांधकाम विभागाचे निविदा प्रक्रियेच्या बाबतीत असलेल्या मार्गदर्शक तत्वानूसार तसेच अटी-शर्तीनूसार नविन निविदा प्रक्रिया ३ दिवसात राबवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- १०  प्रतिकुल मते :- ०३**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव:-** विषय क्र. ९) नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१५ मध्ये मेहरुण अंतर्गत मलिक नगर नाल्यावरील पुला अंतर्गतच्या नाल्याच्या भागास संरक्षण भिंत बांधणे कामी येणारा एकूण रक्कम रु.४५,०६,०४०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१५ मध्ये मेहरुण अंतर्गत मलिक नगर नाल्यावरील पुला अंतर्गतच्या नाल्याच्या भागास संरक्षण भिंत बांधणे कामी राबविलेली निविदा प्रक्रिया ही कायदेशिर नसल्याने प्रशासनाकडून आलेला सदरचा प्रस्ताव (निविदा प्रक्रिया) रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त कामी शासनाचे सार्व.बांधकाम विभागाचे निविदा प्रक्रियेच्या बाबतीत असलेल्या मार्गदर्शक तत्वानूसार तसेच अटी-शर्तीनूसार नविन निविदा प्रक्रिया ३ दिवसात राबवावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- १०  प्रतिकुल मते :- ०३**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोह**

**नगरसचिव विषय क्रं. १० :-** स्थायी समिती ठराव क्रं.३३९ दि.३०/०६/२०२१ अन्वये तहकूब करणेत आलेल्या विषयातील दोन महिनेकरीता अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस १० मजुर कर्मचारी पुरविणे व सदर कामी होणारा

खर्च रक्कम रु.३,१७,४०६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे बाबत तसेच नविन २० मनुष्यबळ लावण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**सौ.ज्योती चव्हाण:-** सभापती महोदय,

**मा.सभापती:-** हो बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे:-** किती वेळेला देणार आहेत हे परत परत अतिक्रमणचा विषय २० माणसं पुरविणे , १० माणसं पुरविणे. मागच्या सभेमध्येच झाला होता हा विषय त्या वेळेलाच झाले होते की निविदा प्रक्रीया करायची. मागील हे करायचे .

**मा.सभापती:-** मागच्या सभेमध्ये आपला विषय झाला होता. त्या बाबत नविन निविदा प्रक्रीया करण्याबाबत काय सुरू आहे त्याबाबत पाटील साहेब माहिती द्या.

**श्री.पवन पाटील:-** सन्मा सभापती , सन्मा.सभागृह याची जी आहे ती निविदा प्रक्रीया करण्याची प्रोसेस चालु झालेली आहे. आता आपण जी निविदा करणार आहोत ती एक वर्षासाठीची करणार आहोत आणि कोविड ची तिसऱ्या लाटेची पार्श्वभुमि विचारात घेता आपण एक वर्षासाठी करतोय आणि ती निविदा उद्यापर्यंत प्रसिध्द होणार आहे. सगळी मान्यता वगैरे त्याला झालेली आहे. तर उद्या निविदा प्रसिध्द होईल एक वर्षासाठीची.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे सभापती महोदय ,

**मा.सभापती:-** हो बोला भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे , आता मागील जे विषय झाले भाऊ ६,७,८, ९ याच पध्दतीने केलेल्या निविदा प्रक्रीया काही निविदा प्रक्रीया या जिल्हा नियोजन मंडळाच्या तर्फे मिळालेल्या निधिच्या अनुषंगाने ज्या निविदा प्रक्रीया राबविलेल्या आहेत त्या सुध्दा अंतिम टप्प्या मध्ये आहेत. त्याच्यामध्ये सुध्दा अश्याप्रकारच्या त्रुटी आहेत. तर आणि त्या त्रुटींच्या अनुषंगाने त्या निविदा प्रकीया आपण ज्या आता राबवु त्या सुध्दा प्रशासनाने या निविदा प्रक्रीया तश्याच पध्दतीने नव्याने नियमानुसार राबवुन त्या निविदा राबवुन नियमानुसार राबविण्यात याव्यात. याची सुध्दा या सुचनेची नोंद घेण्यात यावी.

**मा.सभापती:-** शासनाच्या निर्देशानुसार निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी असेच ना भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी, जी

**मा.सभापती:-** सुचक आणि अनुमोदक कोण आहे ? पुढील विषय घेण्यात यावा. मागचा विषय उज्वलाताई आहेत सुचक त्यांचे नांव घेण्यात यावे..

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस १० मजुर दोन महीनेकरीता पुरविणे कामी मंजुर दर प्रति कामगार रु.५२९.०१/- प्रमाणक एकुण ६० दिवसासाठी येणारा खर्च रु.३,१७,४०६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे बाबत स्थायी समिती ठराव क्र.३३९ दि.३०/०६/२०२१ वरील विषया बाबतचा रु.३,१७,४०६/- खर्चेचा प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समिती मध्ये स्थगीती देण्यात आली आहे. ठरावात नमुद केल्यानुसार आस्थापना सुचिवर कार्यरत कर्मचाऱ्यांचा आढवा घ्यावा मनुष्यबळ उपलब्ध असल्यास तात्काळ कर्मचारी अतिक्रमण विभागास उपलब्ध करुन दयावे जणेकरुन मनपाच्या आस्थापना खर्च कमी होईल.

याबाबत पुर्वी देखील मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे बाबत आस्थापना विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे. मात्र आस्थापना विभागाकडून मनुष्य बळाचा पुरवठा अतिक्रमण विभागाकडेस न झाल्याने शहरात कोराना प्रार्दुभाव जास्त प्रमाणात वाढ झाल्याने जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन यांनी शहरात कोराना प्रार्दुभाव वाढ होत असल्याने जास्त जबाबदारी अतिक्रमण विभागाकडे दिल्याने तात्काळ कोविड कामी आरोग्य विभागाच्या मंजुर दरात २० कर्मचारी मक्तेदाराकडून घेण्यास व येणाऱ्या खर्चास स्थायी समिती ठराव क्र.३२९ दि.१०/०५/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. स्थायी समिती ठराव क्र.३२९ अन्वये आरोग्य विभागाकडील कोविडसाठी मक्तेदार श्री.दिपक उत्तराधी, अमरावती यांचे कडून दि.१७/०४/२०२१ ते दि.१६/०६/२०२१ पर्यंत २० मजुरांचा पुरवठा करण्याचे आदेश दिलेले आहे.

मात्र कोरोना प्रार्दुभाव कमी न झाल्याने आस्थापना विभागाकडुन मनुष्यबळ अदयाप न मिळाल्याने पुनश्च: १० मजुर मिळणे कामी प्रस्ताव सादर केला असता आयुक्त यांनी दोन महीन्या करीता मक्तेदाराकडील मजुर घेण्यास दि.०९/०६/२०२१ रोजी मान्यता दिली आहे.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन यांनी मनपावर जास्त प्रमाणांत जबाबदारी दिल्याने मनुष्य बळाची आवश्यकता असल्याने तसेच कोरोना प्रार्दुभावाची संभाव्य तिसरी लाट व गणेशोत्सव व इतर विविध सण व उत्सव

नजिकच्या कालावधीत येवू घातल्याने अतिक्रमण विभागास निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो अतिरिक्त १० मजुर पुरविणे व याकामी येणारा रक्कम रु.३,१७,४०६/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच अतिरिक्त २० नविन मनुष्यबळ लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते** :- **१३** **प्रतिकुल मते** :- **००**

**सुचक** :- **लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** :- **बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव विषय क्रं. ११ :-** कोविड-१९ अंतर्गत कोरोना योध्दा यांचे वेतनाची रक्कम मनपा फंडातुन मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय ,

**मा.सभापती:-** हो बोला ताई

**सौ.ज्योती चव्हाण :-** हा डॉक्टर साहेबांना प्रश्न विचारायचे आहे सभापती महोदय .

**मा.सभापती:-** हो ताई दोन मिनिटं थांबा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** डॉ. साहेब विषय मला एक सांगा . डॉ.रावलानी , किती योध्दे लावले होते आपण कामाला ११६

**डॉ.राम रावलानी :-** नाही मॅडम सुरूवातीला जास्त होते. जसे जसे लाट कमी होत गेली तसे तसे आपण कमी करत गेलो

**सौ.ज्योती चव्हाण :-** बर आता किती कोविड कोरोना योध्दांचा पगार काढायचा आहे आपल्याला?

**डॉ.राम रावलानी :-** सध्या आपल्याकडे १२ कार्यरत आहेत. परंतू लसीकरणाचे डोस वाढत चाललेले आहेत. तर आपण जसे जसे लोक वाढवु . पण सध्या १२ लोक कार्यरत आहेत.

**सौ.ज्योती चव्हाण :-** १२ जे आहेत आता तुमच्याकडे ,

**डॉ.राम रावलानी :-** हो मॅडम

**सौ.ज्योती चव्हाण :-** आणि तुम्ही कोणत्या निकष आहेत की त्यांना तुम्ही ठेवले आहे आता ? आणि या बाकीच्यांना काढुन टाकले आहे.

**डॉ.राम रावलानी :-** मॅडम सुरूवातीला आपल्याला जसे जसे लागत होते त्याप्रमाणे आपण घेत होतो. तर जशी जशी आपले सेंटर बंद झाले तसे तसे आपण कमी केले आहे मॅडम

**सौ.ज्योती चव्हाण :-** नाही आम्हाला अशी माहिती मिळाली की तुमच्या फेव्हरचे लोकं तुम्ही ठेवले आहेत ते

**डॉ.राम रावलानी :-** नाही नाही ,मॅडम जसे जसे आपल्याला.

**मा.सभापती :-** ताई आपल्या लक्षात आले का अशा काही घटना ?

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो हो अशा घटना लक्षात आल्या म्हणुनच मी बोलतेय.

**मा.सभापती :-** ताई एखादे उदाहरण द्या आपल्या लक्षात असेल तर.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ते जे १२ लोकं आहेत त्यांचे नांव सांगु द्या त्यांना आधी

**डॉ.राम रावलानी :-** डॉ.कल्याणी मिसाळ, डॉ.निकीता प्रत्थ्याणी , धनश्री वाघ , सुलभा भामरे , मुकेश पाटील , सदानंद खैरनार , नरेश भोसले , योगेश शिंपी , राहुल निबांळकर , मिथिलेख भिडे , चेतन पाटील आणि डिंपल पवार.

**सौ.ज्योती चव्हाण :-** नाही काही त्या निकष मध्ये बसत नाहीयेत तरी त्यांना ठेवले आहे त्या ठिकाणी असं मला माहिती पडले आहे.

**डॉ.राम रावलानी :-** नाही मॅडम सुरूवातीला आपण ईन्टरव्ह्यु घेतलेले होते . त्या ईन्टरव्ह्यु मधीलच आपण घेतलेले होते आणि ते अजुनही आपल्याकडे आहेत.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो , कारण आता आपण स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत महेंद्र पवारची नेमणूक केली होती. बरोबर आहे. आयुक्त साहेब त्यांचा पगार आपण मनपा फंडातुन काढणार होतो. तर तो आपण रद्द केला. सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हो ताई आपण रद्द केला होता.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो , हो आणि अश्विनी सैंदाणे म्हणुन आपल्याकडे वर्कर होती. NHUM अंतर्गत तीची एक वर्षासाठी नेमणूक झाली होती. आणि तीचा पगार मनपा फंडातुन काढायचा होता. तर आपण तोही विषय रद्द

केलेला आहे. मग आपण आत्ताच का या लोकांचे पगार मनपा फंडातुन काढावे. मनपा तिजोरीवर याचा अतिरीक्त बोझा पडणार नाहीये का आपल्या ?

**डॉ.राम रावलानी :-** मॅडम हॅलो

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो बोला बोला

**डॉ.राम रावलानी :-** मॅडम हॅलो

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो , बरोबर

**डॉ.राम रावलानी :-** आता जी आपत्ती आली आणि आपण याच्यामध्ये सर्व संसर्गजन्य आजारांबाबत तरतूद केलेली आहे. तरी आम्ही शासनाकडुन त्यांचे पैसे मागवत होतो. परंतू आता त्याला शासनाने पैसे द्यायला नकार दिलेला आहे. म्हणुन यांची गरज असल्यामुळे लसीकरणाचा कार्यक्रम चालु आहे आणि तिसरी लाटची पण शक्यता आहे तर त्या हेतूने आपल्याला हे करण आवश्यक आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** पण येथे आयुक्तांच मतच दिलेले नाहीये ना.

**डॉ.राम रावलानी :-** आहे ना मॅडम त्यांनी मान्य केलेले आहे ना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** आयुक्त साहेबांनी मंजुर केलेले आहे ते मान्य असं म्हंटलेले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई कस आहे की आता कोरोनाचा प्रादुर्भाव हा कमी झालेला असुन आणि लसीकरणाचं काम हे प्रगती पथावर आहे तरी या कामाला मान्यता देणे संयुक्तिक राहील आणि आपल्याकडे असलेले आपले स्वत:चे मनुष्यबळ पाहाता तर आपल्याला लोकांना घेणे आवश्यकच आहे. तरी म्हणुन मला तरी वाटत की याला मान्यता देण्यास काही हरकत नाही.

**सौ.ज्योती चव्हाण :-** नाही नितीनभाऊ ते बरोबर आहे. पण तिथले कर्मचारी मेंहदी काढत होते अस आले आहे पेपरला तर मग काय म्हणायचे आम्ही

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई याच्यामध्ये ज्या काही आपल्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या असतील .

**सौ.ज्योती चव्हाण :-** तेव्हा कुठे गेले होते डॉक्टर साहेब

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर डॉक्टर साहेबांनी असा विषय हा गांर्भीयाने हाताळला पाहीजे. की शेवटी आपण कर्मचारी

**सौ.ज्योती चव्हाण :-** ते फक्त तिथे बसुन राहतात. त्यांच्यावर नियंत्रण काय ठेवता हे .

**मा.सभापती :-** त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली?

**डॉ.राम रावलानी :-** मॅडम त्यावेळेला जो आपला कार्यालयाचा वेळ म्हणजे टाईम होता तो संपलेला होता कार्यालयातुन ते निघत होते पाऊस आल्यामुळे ते थांबुन गेले तिथे , तरी त्यांना नोटीस देण्यात आली आणि ताकीद देण्यात आली आहे की याच्यापुढे जर असे झाले तर अजुन कडक कार्यवाही करण्यात येईल. त्यांना कार्यवाही पण केलेली आहे. आपण त्यांना नोटीसपण काढलेली आहे आणि ताकीदपण दिलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अहो एक एक तास तिथे मेहंदी काढत होते ते

**सौ.ज्योती चव्हाण :-** जर पेपरला येईपर्यंत तुमचं लक्ष नसेल तर काय कामाचं ते

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामचं अपेक्षित असतात.आपण थोडस

**सौ.ज्योती चव्हाण :-** लोकप्रतिनिधी म्हणुन तुमच्यावर लक्ष ठेवणे काम आहे .

**डॉ.राम रावलानी :-** हो मॅडम मी त्यांना ताकीद दिलेली आहे. आणि मी त्यावेळेस बाहेर होतो कारण की एका पेशंटला रिॲक्शन आलेली होती. मी तिकडे गेलेलो होतो. आणि ६ वाजेनंतरची ही गोष्ट आहे मी आल्यानंतर त्यांना मी पुढच्या दिवशी ताकीद दिली आणि नोटीसपण दिलेली आहे.

**मा.सभापती :-** डॉक्टरसाहेब ठिक आहे त्यांची वेळ संपलेली असेल. पण आपण कुठे बसलेलो आहोत. कोणत्या ठिकाणी आहोत याच गांभीर्य पाहीजे.

**डॉ.राम रावलानी :-** हो सर बरोबर आहे. त्यांनी माफी मागीतली.

**मा.सभापती :-** आपण मागे काही कार्यालयामध्ये कर्मचारी दारू पितांना बघितले. त्यांना निलंबित केले त्यांची वेळ संपली रात्री केली त्यांनी पार्टी , मग त्यांनी केल पाहीजे का तिथे असं.

**डॉ.राम रावलानी :-** नाही सर हे चुकीचे आहे मी बोललोय त्यांना ताकीद पण दिलेली आहे की याच्या पुढे झाले तर डिसकंटीन्यु करण्यात येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हो बोला भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अशा बाबतीत पेपरबाजी होते. म्हणजे याच्यात कर्मचारी किंवा महापालिकेचे नांव खराब होत नाही का ? सदस्य म्हणुन आपले पण नांव खराब होते आपण का सदस्य म्हणुन निवडून गेलो आहे तिथे ? यांचा या डॉक्टरांचा एक पगार थांबविण्यात यावा. तेव्हा हे सुधरतील असे सुधरणार नाहीयेत हे. ह्यांचा एक पगार थांबविण्यात यावा.

**श्री.प्रशांत नाईक :-** डॉ.रावलानींचा पगार थांबविण्यात यावा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** एक पगार थांबवावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** याला सर्वस्वी जबाबदारी आहे त्यांची

**सौ.ज्योती चव्हाण :-** नाही सभापती महोदय अजून एक बातमी डॉक्टरांच्याच संदर्भात होती.

**श्री.प्रशांत नाईक :-** डॉ.रावलानींचा एक महिन्याचा पगार थांबविण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** डॉ.रावलानींचा एक महिन्याचा पगार थांबविण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ हे कोविड ला देतात आणि इकडे देतात हे उडवाउडवीचे उत्तरे आहेत हे यांचा एक महिन्याचा पगार थांबवा तुम्ही

**श्री.प्रशांत नाईक :-** डॉ.रावलानींचा एक महिन्याचा पगार थांबविण्यात यावा भाऊ

**मा.सभापती :-** भाऊ याला जे आहे ना

**श्री.प्रशांत नाईक :-** नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही भाऊ ऐका ना.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ चार वेळा विषय झाला आहे. आम्ही महापालिकेत किती पुरावे द्यायचे.

**मा.सभापती :-** सन्मा. सदस्य यांनी

**श्री.नितीन लढ्ढा :-** भाऊ ऐका ना मी सर्व सदस्यांच्या भावना समजतो. परंतू सदस्यांच्या भावनांसोबत डॉ.साहेबांनी सुध्दा या कोविड काळामध्ये अथक परिश्रम घेतलेले आहेत. आपण कुठेतरी त्यांना एक संधी द्यायला पाहीजे. भविष्यात त्यांच्याकडून चुक होणार नाही.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि या पध्दतीने आपण अशी अपेक्षा व्यक्त करूया .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ यांच्याबद्दल किती बोलायचे आता एक वर्षातचे कितीक पुरावे द्यायचे यांच्याबद्दल.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कितीक पुरावे देवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुन्हा जर कधी अशी चुक घडली ना.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ सदरचे कर्मचारी हे आपले कायम कर्मचारी नाहीयेत. कॉन्ट्रक्ट बेसवरचे लोकं आहेत. आणि त्यांना आपण

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अहो पगार देतोय ना आपण त्यांना

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ ऐका ना

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** म्हणजे काय पगारच द्यायचा का ? नगरपालिका फंडातुन कसा देता येईल.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ याच्यापुढे ते दोषी आढळले तर आपण त्यांना कामावरून कमी करू.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही नाही तुम्ही म्हणतात की ते आपल्या नगरपालिकेचे कर्मचारी नाहीत . तर त्यांना पगार देणार नाहीत का की फुकट काम करणार आहेत का ते ?

**श्री.प्रशांत नाईक :-** शासनाचेच कर्मचारी आहेत ना ते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मग , तुम्ही द्या तुमच्या खिश्यातुन पगार असे कसे चालेल.

**मा.सभापती :-** मग असे जर म्हंटले तर आपली पुर्ण महापालिका खाली होवुन जाईल काम आपल्याला कर्मचारी म्हणुन कामं करावे लागतील भाऊ

**सौ. उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही नाही मग राजुभाऊ

**मा.सभापती :-** आणि तस जर करत राहीलो ना आपण

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** राजुभाऊ ऐकुन घ्या.

**मा.सभापती :-** आणि आपले खुप लोक रिटायर्ड झालेले आहेत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** राजुभाऊ अहो

**श्री.प्रशांत नाईक :-** नवनाथभाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अहो सभापती महोदय,

**मा.सभापती :-** आणि याचा

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती साहेब माझ एक म्हणणे आहे हे कुठपर्यंत यांना वॉर्निंग देत राहाल तुम्ही कर्मचारी लोकांना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नवनाथ भाऊ ही अंतिम वॉर्निंग आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती साहेब मी चार वेळा सांगीतले , दवाखान्याचे डॉक्टर जे आहे ते म्हणता तुमचे इंजेक्शन संपुन जाता. त्यांच्या मुदती संपुन जाता तरी हे माणस लक्ष देत नाही आणि तुम्ही म्हणता यांच्यावर अजुन त्यांच्यावर कारवाई करू नका , कारवाई करू नका हे कुठपर्यंत चालणार आहे.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** एकदाचा हा विषय संपवा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नवनाथ भाऊ आता एक अंतिम एक संधी देवु त्यांना त्यांच्या कार्यामध्ये जर कधी काही सुधारणा घडल्या नाही किंवा पुढे पुनश्च अशा चुकीची पुनरावृत्ती होत असेल. तर निश्चितपणे सर्व सभागृहातील सदस्य मिळुन त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करू. एक संधी आता त्यांना देण्यात यावी. कारण अजुनही कोरोनाचा काळ गेलेला नाहीये. अजुनही आपल्या याच्यावर आपल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण आहे आणि या अनुषंगाने काही चुका घडल्या असतील. तरी आपण त्यांना या संदर्भात सुचना करून भविष्यात चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यायला लावु त्यांना

**सौ. ज्योती चव्हाण :-** नाही पण नितीनभाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ जोपर्यंत कारवाई होत नाही तोपर्यंत खालचे लोकं घाबरणार नाहीत ना

**सौ. ज्योती चव्हाण :-** नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** नवनाथ भाऊ एक शेवटची एक संधी देवु त्यांना शेवटची संधी देवुन जर कधी सुधारणा नाही झाली तर निश्चितपणे आपण कारवाई करू.

**श्री.प्रशांत नाईक :-** नवनाथभाऊ

**सौ. ज्योती चव्हाण :-** पण किती महिन्यांसाठी आपण हे कर्मचारी परत ठेवणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा

**सौ. ज्योती चव्हाण :-** किती महिन्यांसाठी आपण ठेवणार आहे यांना आता

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही ताई काय आहे जोपर्यंत लसीकरणाचे काम पुर्ण होत नाहीना तोपर्यंत आपल्याला या मनुष्यबळाची आवश्यकता पडेलच. पण ज्यादिवशी या

**सौ. ज्योती चव्हाण :-** पण एक कार्यकाळ ठरवुन घेवु भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्यकाळ आपल्या हातातील नाहीये. लसीकरणाचा कार्यकाळ हा आपल्या हातातील नाहीये. की नागरीक केव्हा केव्हा लसीला येतील आणि ज्यावेळेला आपल्याला वाटेल की लसीकरण हे अंतिम टप्प्यात आलेले आहे. आता हे कर्मचारी वर्ग जे आहेत ते आपल्याकडे अतिरीक्त मनुष्यबळ म्हणुन दिसायला लागेल. तर निश्चितपणे या कर्मचाऱ्यांना कमी करून आपण आपल्या असलेल्या कायमस्वरूपी असलेल्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन ही लसीकरणाची मोहिम पुढे नेत राहू

**सौ. ज्योती चव्हाण :-** हो भाऊ असंही करता येईल आपल्याला की आता ११६ लोकं होते यांच्याकडे याच्यातील तुम्ही दर दोन - दोन महिन्यांनी वेगवेगळे घ्याना मग

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ताई प्रॉब्लेम कसा आहे की जी मंडळी आता या कामामध्ये ट्रेन झालेली असेल .त्यांना बदलवुन नव्याला आणायचे आणि नव्याला शिकवायचं आणि पुन्हा त्याच्यावर वेळ खर्च करणं हे मला वाटत संयुक्तिक होणार नाही आणि लसीकरणाचा मला वाटत हा समजुन घ्या. की या टप्प्याला चांगला वेग आलेला आहे. आपण हीच अपेक्षा करूया की हे लसीकरण तातडीने पुर्ण व्हावं आणि संपुर्ण जळगांव शहर जे आहे हे कोरोना मुक्त व्हावं. जेणेकरून या अतिरिक्त मनुष्यबळाची गरज जोपर्यंत आपल्याला आहे तोपर्यंतच आपण ठेवु. त्यावेळेला हे कर्मचारी कमी करण्याच्या अनुषंगाने प्रशासनाला सुचना देवु.

**सौ. ज्योती चव्हाण :-** हो भाऊ हे सगळ बरोबर आहे. तुम्ही ते पण हे निकष ह्या सगळ्या लोकांनापण होते. त्यांनापण सगळं काम येतय जे यांना येतय ते त्यांना पण येतय . बरोबर मग यांनाच कंटिन्यु करण्यापेक्षा एक - एक , दोन - दोन महिना त्यांनापण घ्याना तुम्ही त्यांचाही आर्थिक लाभ होईल थोडासा

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे प्रशासनाने या संदर्भात प्रशासनाने ज्योतीताईंची जी सुचना आहे तिचा विचार करून प्रत्येकाला म्हणजे जे निष्णांत असतील याच्यामध्ये त्यांना संधी देता येत असेल तर त्या पध्दतीने प्रशासनाने प्रयत्न करावे.

**श्री.प्रशांत नाईक :-** रावलानी सर ,
**सौ. ज्योती चव्हाण :-** हो बरोबर आहे.
**श्री.प्रशांत नाईक :-** रावलानी सर , जे आपले ११६ कर्मचारी होते. त्यामधील ८६ कर्मचारी कार्यरत आहेत. तिसऱ्या लाटची शक्यता आहे. आपण कर्मचारी वाढवणार आहेत.
**सौ. ज्योती चव्हाण :-** हो शक्यता आहे.
**श्री.प्रशांत नाईक :-** त्यामध्ये आपण ११६ जे आहेत ज्यांना आपण कमी केले आहे त्यांनाच संधी देण्यात यावी.
**सौ. ज्योती चव्हाण :-** हो तेच हे यांना कंटिन्यु करा. दोन दोन महिन्यांसाठी घ्या.
**श्री.प्रशांत नाईक :-** रावलानी सर ,
**सौ. ज्योती चव्हाण :-** डॉक्टरसाहेब सगळयांना समान संधी मिळाली पाहीजे हेच कंटिन्यु नको.
**श्री.प्रशांत नाईक :-** रावलानी सर ,
**मा.सभापती :-** हो बोला डॉक्टरसाहेब तुम्ही
**श्री.प्रशांत नाईक :-** जे ११६ होते ना आपले
**डॉ.राम रावलानी :-** हो सर
**श्री.प्रशांत नाईक :-** जे ११६ होते ना आपले पहिले
**डॉ.राम रावलानी :-** हो सर
**श्री.प्रशांत नाईक :-** त्याच्यातील आपण ८६ ठेवलेले आहेत. बाकीचे पाठविलेले आहेत घरी आता
**डॉ.राम रावलानी :-** हो सर
**श्री.प्रशांत नाईक :-** तिसरी लाट जी येणार आहे आता
**डॉ.राम रावलानी :-** हो सर
**श्री.प्रशांत नाईक :-** जे कर्मचारी लागणार आहेत तर यांनाच संधी देण्यात यावी.
**डॉ.राम रावलानी :-** हो सर
**श्री.प्रशांत नाईक :-** कारण की यांना पुर्ण अनुभव आहे. कारण हे पहिल्यापासुन आपल्या सोबत आहेत.
**डॉ.राम रावलानी :-** हो सर
**श्री.प्रशांत नाईक :-** तर त्यांनाच संधी देण्यात यावी . ही सुचना आहे आमची
**डॉ.राम रावलानी :-** यस सर
**श्री.नितीन लढ्ढा :-** चला घ्या पुढचा विषय घ्या.
**मा.सभापती :-** विषय मंजुर ?
**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर , मंजुर चला घ्या पुढचा विषय घ्या.
**मा.सभापती :-** अनुमोदन ? ज्योतीताई चव्हाण अनुमोदन आहे.
**सौ. ज्योती चव्हाण :-** हो
**श्री.नितीन लढ्ढा :-** घ्या विषय क्रं. १२

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.३६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर म.न.पा.दवाखाना विभागा अंतर्गत कोरोना संदर्भातील सर्व कामे करण्यासाठी उदा.कोविड केअर सेंटर, टेस्टिंग सेंटर, हेल्थ पोस्ट तसेच लसिकरणासाठी विविध पदांवरील ११६ कोरोना योध्दांची माहे मार्च २०२१ महिन्यात भरती करण्यात आलेली होती. जसजसा कोरोनाचा प्रार्दुभाव कमी होत गेला तसतसे कोरोना योध्दांना कमी करण्यात आले. त्यानंतर माहे जुन २०२१ मध्ये ८६, जुलै २०२१ मध्ये ४० कोरोना योध्दा कार्यरत होते.

कोरोना काळात भरती केलेल्या कोरोना योध्दांच्या वेतनापोटी जिल्हा परिषद यांचेकडुन NUHM माहे मे-२०२१ पर्यंतचे अनुदान मिळाले होते. तदनंतर पत्रव्यवहार केला असता माहे जुन-२०२१ पासुन त्यांनी अनुदान देण्यास नकार दिला. परंतु सदर कर्मचाऱ्यांच्या कामाची निकड लक्षात घेता आवश्यक होते.

या कर्मचाऱ्यांचा माहे मे-२०२१ च्या प्राप्त झालेल्या रकमेपैकी रु.३,२२,६२३/- व जुन-२०२१ चा रु.११,२२,३९८/- असा एकुण रु.१४,४५,०२१/- इतका अतिरिक्त पगार NUHM च्या निधीमधुन करण्यात आलेला आहे. ती रक्कम NUHM च्या निधित जमा करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचा माहे जुलै-२०२१ च्या वेतनाची एकुण रक्कम रु.६,४७,४२०/- इतकी अदा करणे बाकी आहे.

सदयस्थितीत कोविड-१९ टेस्टिंग सेंटर व लसीकरण केंद्र चालविण्यासाठी ३ वॉर्ड बॉय, ३ लॅब टेक्निशियन, ५ डाटा एन्ट्री ऑपरेटर आणि ३ डॉक्टर्सची आवश्यकता आहे. सदर पदांच्या कोरोना योध्दांना

तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत ठेवणे कामी व वेतनाची रक्कम मनपा फंडातून देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

भविष्यात कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता लक्षात घेता, प्रादुर्भाव वाढल्यास सदयस्थितीत दवाखाना विभागात कार्यरत असलेल्या स्टाफची कमतरता लक्षात घेता अतिरीक्त स्टाफची पुन्हा आवश्यकता भासण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने भविष्यात कोरोनासाठी लागणारे कर्मचारी भरणेस व त्यांचा पगार मनपा फंडातून अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

पदनिहाय देण्यात येणाऱ्या वेतनाबाबतचा तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्र. | पदे | मासिक वेतनाची रक्कम |
|---|---|---|
| १ | वैदयकिय अधिकारी | रु.३०,०००/- पर्यंत |
| २ | ए.एन.एम. | रु.१८,०००/- पर्यंत |
| ३ | लॅब टेक्निशियन | रु.१७,०००/- पर्यंत |
| ४ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | रु.१७,०००/- पर्यंत |
| ५ | वॉर्ड बाय/आया | रु.१२,०००/- |

वरिप्रमाणे रक्कम रु.१४,४५,०२१/- इतकी रक्कम NUHM च्या निधीत मनपा फंडातुन जमा करणेस व कोरोना योध्दांचे जुलै-२०२१ च्या वेतनाची रक्कम रु.६,४७,४२०/- मात्र मनपा फंडातुन अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच १२ कर्मचाऱ्यांप्रमाणेच यापूर्वी मंजूर केलेली मानधनावरील एकूण ११६ कर्मचाऱ्या मधून सर्वांना समान संधी देण्यात यावी. दोन - दोन महिन्यानंतर इतर दुसऱ्या कर्मचाऱ्यांना सुध्दा संधी देण्यात यावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**नगरसचिव विषय क्रं. १२** :- मनपा आरोग्य विभागाकडील मशिन क्रं.एम एच १९ एम ०३२८ (जे.सी.बी.) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा रक्कम रु.५४,६६९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हो बोला.

**श्री.प्रशांत नाईक :-** या विषयावर बोलायचे आहे. आरोग्याधिकारी पवन पाटील याच्याशी बोलायचे होते.

**मा.सभापती :-** पाटील साहेब .

**श्री.प्रशांत नाईक :-** पवन पाटील पाटील साहेब.

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** हो बोला.

**श्री.प्रशांत नाईक :-** आता हे मशिन कुठे चालु आहे सद्या ?

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** हे आपण कचरा डेपोवरच वापरत होतो. तिथे ते काही कारणाने नादुरूस्त झाले आणि त्याच्या दुरूस्तीच्या संबंधिचा जो प्रस्ताव आहे हा वाहन विभागाने ठेवलेला आहे. मग तो आता येथे

**श्री.प्रशांत नाईक :-** आता चालु आर्थिक वर्षामध्ये आणि मागच्या चालु आर्थिक वर्षामध्ये किती खर्च झाला आहे त्याच्यावर आपल्याला माहिती आहे का ?

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** त्याची दुरूस्ती संबंधी का ?

**श्री.प्रशांत नाईक :-** हो दुरूस्तीच

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** याची माहिती वाहन विभागाकडुन दिली जाईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** किती दिली पाहीजे सर

**मा.सभापती :-** प्रशांतभाऊ तुम्हाला याच्या खर्चावरील माहीती पाहीजे आहे की याच्याशी रिलेटेड पाहीजे आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** दुरुस्तीची पाहीजे.

**मा.सभापती :-** नाही पाटील साहेब त्याचे उत्तर देतील. आणि खर्चाबद्दल विषय असेल तर वाहन विभाग देईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ खर्चाबाबतचाच विषय आहे ही अशी आपण मागणी करतोय ना.

**मा.सभापती :-** हो ना

**श्री.प्रशांत नाईक :-** राजुभाऊ

**मा.सभापती :-** वाहन विभाग

**श्री.नितीन लढ्ढा :-** माहिती डॉकेटमध्ये आहे ना. डॉकेटमध्ये माहिती आहे ना की आर्थिक वर्ष २०२१-२२ चा

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**श्री.नितीन लढ्ढा :-** चा ३६०९८/- रूपये आत्तापर्यंत खर्च झालेला आहे

**श्री.प्रशांत नाईक :-** ठिक आहे हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि आर्थिक वर्ष २०-२१ मध्ये २१५३८३/- रूपये झाला होता. १९-२० मध्ये २५४७९२/- रूपये आहे आणि या चालु वर्षात ३६०९८/- रूपये झालेला आहे आणि आता हा ५४६६९/- रूपये प्रस्तावित केलेला आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** एवढ्या याच्यात तर नविन जेसीबी आले असते नगरपालिकेत

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही आले असते ना , फक्त जेसीबीचे टायर आले असते.

**मा.सभापती :-** भाऊ नवनाथ भाऊंनी उपलब्ध करून दिले असते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** बाकीचा फंड तुम्ही दिला असता ना भाऊ

**सौ. ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, आधी किती किती खर्च केला आहे त्याच हे द्याना पण

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई डॉकेटवर आहे.

**सौ. ज्योती चव्हाण :-** आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो हो आहे. डॉकेटवर १९-२० , २०-२१ आणि २१-२२ या तिनही आर्थिक वर्षाचा आत्तापर्यंत किती खर्च झालेला आहे तर डॉकेटवर ती माहिती दिलेली आहे.

**सौ. ज्योती चव्हाण :-** बर बर

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो

**श्री.प्रशांत नाईक :-** वारंवार खराब होत का हे मशिन ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशांतभाऊ आता हे जेसीबी जे आहे. कचरा डेपोतील ते कालबाह्य झालेले आहे आणि त्याचा सातत्याने घनकचरा प्रकल्पावर जो जमा होणारा कचरा त्या कचऱ्याची व्याप्ती पाहाता तिथे निरंतर हा जेसीबी चालत असतो आणि शेवटी कितीही म्हंटल तर या कालबाह्य झालेल्या मशिनरी आहेत. भविष्यात आपल्याला नविन मशिनरी घेण्याच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. तोपर्यंत याच्यावर दुरूस्तीचा खर्च करणं अपेक्षित आहे.

**मा.सभापती :-** भाऊ आता

**श्री.प्रशांत नाईक :-** पावसाळा चालु आहे. नाले चोकअप होत असतात.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**श्री.प्रशांत नाईक :-** आपण त्यांना सांगावे तर ते प्रत्येक वेळेस सांगतात की नादुरूस्त आहे असे, घनकचरा डेपोवर यांनी फोन केला असता ना की जे नाले चोकअप होतात.

**मा.सभापती :-** भाऊ जेसीबी नादुरूस्तीचे उत्तरे मिळता म्हणुन आपण मागे सभेमध्ये निर्णय घेतला होता की आपण ४ जेसीबी भाड्याने घ्यावे. पण त्याच्यावर अजूनही काहीच कार्यवाही झालेली नाहीये.

**सौ. ज्योती चव्हाण :-** कधीच जेसीबी मिळत नाही महापालिकेचे सभापती महोदय

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाले स्केटर , स्क्रुटींग मशिन , जेसीबी काहीच नाहीये याच्यात आठ महिने झाले ओरडुन राहीले आहे सभेमध्ये

**श्री.प्रशांत नाईक :-** राजुभाऊ , आता आमच्याकडे जो नाला आहे ना

**सौ. ज्योती चव्हाण :-** नाला साफ करतांना स्वत:च्या खर्चाने जेसीबी लावावे लागले आहे आम्हाला

**श्री.प्रशांत नाईक :-** माझ्याकडेही तिच परिस्थिती झाली नाला चोकअप झाला तर जेसीबी उपलब्ध झाले नाही माझ्याकडे

**सौ. ज्योती चव्हाण :-** हो होतच नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** जेसीबी नादुरूस्त आहे असे उत्तरे दिले जातात. जेव्हापण आपण या चार महिन्यात पाच महिन्यात फोन केला आहे .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, आरोग्याचा प्रश्नच कठीण आहे.

**सौ. ज्योती चव्हाण :-** हो बरोबर आहे ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तेच उत्तर मिळत असत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदया,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** प्रशासन आता जागे झालेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदया, या संदर्भातील वस्तुस्थिती निश्चित खरी आहे की हा जो वाहन व्यवस्था व दुरूस्तीचा विभाग आहे आपला आरोग्य विभाग त्यांच्याकडे नादुरूस्त असलेल्या वाहनांचे प्रस्ताव वाहन विभागाकडे पाठवतो. परंतू वाहन विभाग ज्या गतीने काम करणे अपेक्षित आहे. त्या गतीने वाहन विभाग काम करत नाही आणि पर्यायाने ही वाहने दुरूस्ती अभावी बराच काळ जी आहे ही आपल्या जागेवरच उभी राहतात आणि त्याचा सगळा परिणाम जो आहे. या शहराच्या आरोग्यावर होतो. सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या कामांवर याचा परिणाम होतो. तरी आपण आज वाहन विभागाला सक्त सुचना वाहन विभागाला करण्यात याव्या की आरोग्य विभागाची जी काही वाहने असतील. मग आरोग्य विभागाची असतील , लाईट विभागाची असतील. या ताबडतोब गॅरेजला पाठवुन त्या दुरूस्ती वेळेत करणे अपेक्षित आहे. अश्या पध्दतीच्या सक्त सुचना आपण त्यांना द्याव्यात.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** पाटील साहेब माहिती द्या यांना

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** सभागृहाला अवगत करा तुम्ही

**श्री.पवन पाटील , आरोग्याधिकारी :-** आपण प्रभाग समिती निहाय एक एक जेसीबी भाड्याने लावण्या संदर्भात निविदा प्रसिध्द करत आहोत.त्याच्या खर्चाला मान्यता मिळाल्यावर त्याच्या पुढची सगळी प्रोसेस झाल्यावर हे सगळ काम करण्यात येईल. तोपर्यंत आपल्याकडे उपलब्ध जे जेसीबी आहेत. ते कचरा डेपोवर व्यस्त असल्यामुळे या कामांसाठी बऱ्याचदा उपलब्ध करता येत नाही.ते कचरा डेपोवर रेग्युलरली काम करत असल्यामुळे त्यांच्या बिघाडाचे प्रमाण जास्त आहे. ते फक्त लवकरात लवकर दुरूस्ती व्हावे या संबंधी आपण पुढची प्रोसेस करुया

**श्री.प्रशांत नाईक :-** पाटील साहेब हे प्रभाग समितीला जेसीबी लागणार आहे आता याची प्रक्रीया कुठे आहे ? आता

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, साहेब ही प्रक्रीया किती दिवसात होईल ?

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** त्याला मान्यता झाली की ती निविदा प्रसिध्द करण्यात येईल. येत्या दोन दिवसांत

**सौ.उज्वला बेंडाळे :-** लवकर करा साहेब कारण सगळे ओपन स्पेस , प्लॉट साफ करायला

**श्री.प्रशांत नाईक :-** पाटील साहेब पावसाळा आहे . डास आहेत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पावसामुळे डास हे जास्त झालेले आहेत. नागरीक आम्हाला बोलतात साहेब आणि आरोग्याचे आम्हाला आधीच जेसीबी मिळत नाही. जर असा वारंवार उशिर होत असेल

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** निविदा प्रक्रीया लवकरात लवकर करण्यात येईल.

**मा.सभापती :-** हो , विषय मंजुर करायचा का भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो मंजुर करा.

**मा.सभापती :-** अनुमोदन ?

**श्री.प्रशांत नाईक :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :-** पुढचा विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा आरोग्य विभागाकडील मशिन क्रं.एम एच १९ एम ०३२८ (जे.सी.बी.) वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे पार्टस् / मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा मशिन क्रं.एम एच १९ एम ०३२८ (जे.सी.बी.) (उत्पादीत वर्ष जुन-२००७) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | GA C/Wheel & Pinion 13/38 -1 Nos | ८ | O-Ring Seal -2 Nos |
| २ | Triple IP Seal -1 Nos | ९ | Brakefriction Plate -10 Nos |
| ३ | Static Nut –M30X2 -1 Nos | १० | Breake Counter Plate -12 Nos |
| ४ | Taper Roller Bearing -1 Nos | ११ | Brake Seal -2 Nos |
| ५ | Spherical Washer -4 Nos | १२ | Brake Seal -2 Nos |
| ६ | Side Gear Washer -2 Nos | १३ | JCB Rear Axle Oil -25 ltr |
| ७ | Tapper Roller Bearing -1 Nos | १४ | Rear Axle Crown Wheel and Pinion Change (Labour Charge), Break Plate Friction & Counter Change (Labour Charge) |

नमुद वाहनाचे वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे पार्टस्/मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.सुयान इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.जळगांव यांचेकडील प्रोफॉर्मा इन्व्हाइस नुसार रक्कम रु.५४,६६९/- मात्रचे खर्चास निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५ (२) (२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- नाईक प्रशांत सुरेश**

**नगरसचिव विषय क्रं. १३ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, संविदांची माहिती घेण्यात ओलेली आहे.

**मा.सभापती :-** हो भाऊ

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ ते अतिक्रमणचे याच्यात येणार नाही का ते

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुठले सांगा ना ते

**मा.सभापती :-** पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही , हो तो एक आहे जादा विषय

**मा.सभापती :-** हो भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** फक्त याच्यामधील ज्या संविदा मान्य केल्या आहेत ना

**नगरसचिव :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये समजा प्रभाग क्रं. १४ ची शिरसोली नाका , तांबापुर रोड, लक्ष्मी हार्डवेअर , हायवे पर्यंत जी गटार साईडला आहे . परंतू राजुभाऊ येथे तुमचाच प्रभाग आहे. परंतू जे काही अतिक्रमण असेल. ते अतिक्रमण काढुन नंतर त्या कामाला प्रत्यक्ष सुरूवात करण्यात यावी जेणेकरून अतिक्रमणही निघेल आणि गटारीचे कामही व्यवस्थित होईल.

**मा.सभापती :-** हो भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हो बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** एक विचारायचे आहे अमृत योजनेबद्दल कोण माहिती देईल त्यांना बोलवा.

**मा.सभापती :-** ताई हा विषयपत्रिकेवरील शेवटचा विषय आहे. जोडपत्राचा तो केल्यानंतर मग आपण चर्चा करू.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** बर करून घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./७१ दि.११/०८/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१४ मध्ये शिरसोली नाका, तांबापूरा चौक ते लक्ष्मी हार्डवेअर हायवे पर्यंत रोड साईडने गटार बांधुन रोड क्रॉसिंगला स्लॅब बांधणे कामी मक्तेदार श्री.विवेक प्रभाकर खर्चे यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,९१३/- मात्र खर्चाची संविदा.
२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./७२ दि.११/०८/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०८ अंतर्गत पवार पार्क व परीसरात गटार बांधणे कामी मक्तेदार ज्योती लक्ष्मण कोळी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९८,६३८/- मात्र खर्चाची संविदा.
३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./७४ दि.२०/०८/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०८ स.नं.२९० हर्षगिरी अपार्टमेंन्ट श्रीराम कॉलनी व वाघुळदे नगर मध्ये आर.सी.सी. गटार बांधणे

कामी मक्तेदार रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,९९,७३८/- मात्र खर्चाची संविदा.

प्रशासनाने उपरोक्त संविदेप्रमाणे गटार बांधण्याचे काम सुरु करण्याचे अगोदर गटारीच्या जागेवर अतिक्रमण झालेले असल्यास प्रथम ते अतिक्रमण काढण्यात यावे त्यानंतर कामाला सुरुवात करण्यात यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव जादा विषय क्रं. १:-** स्थायी समिती ठराव क्रं.३५१ दि.०६/०८/२०२१ अन्वये तहकूब केलेल्या ठरावात निर्देशीत केल्यानुसार शहरातील मेलेले जनावरांची प्रेत उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांना समान काम समान वेतन देणे व मुदतवाढ देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. कमीत कमी आता त्या कर्मचाऱ्यांना थोडा का होईना लाभ तरी वाढला त्यांचा आणि खऱ्या अर्थाने जे योग्य काम करतात. त्यांना योग्य मोबदला मिळणं हे अपेक्षित होत. त्याचा आता या पध्दतीने प्रस्ताव पाठवला आहे. पुर्वी त्यांना १४ हजार रूपये मानधन देण्यात येत होत. आता कमीत कमी त्यांना समान काम समान वेतन या तत्वानुसार १६,९२०/- रूपये वेतन मिळेल. हा विषय मान्य करण्यात यावा आणि तातडीने त्यांना या पध्दतीने पुढील वेतन अदा करण्यात यावे.

**श्री.प्रशांत नाईक :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची प्रेत उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. अर्जदार / मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांनी दि.१४/०७/२०२१ रोजी अर्ज देवून शहरातील मेलेले जनावरे उचलणे कामाकरिता ६ महिने करिता मुदत वाढीचा अर्ज केलेला आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार हे गेल्या १५ ते २० वर्षापासून ६ महिन्याचे मुदतीवर प्रत्येकी रु.१४,०००/- प्रमाणे मानधनावर दोन्ही कामगार शहरातील दैनंदिन मेलेले जनावरे उचलणेचे काम व्यवस्थित करित असून स्थायी समिती ठराव क्रं.२६० दि.२५/०८/२०२० मंजूरी अन्वये दरमहा रु.१४,०००/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरर्ती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची मुदत दि.२५/०२/२०२१ पासून ते पूढील ६ महिने दि.२४/०८/२०२१ रोजी संपत असल्याने पूढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी पुन्हा दोन दिवसांचा खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक आहे. करिता श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना पुर्वीच्या नियुक्ती मध्ये २ दिवसांचा खंड देवून दि.२७/०८/२०२१ ते दि.२६/०१/२०२२ पर्यंत (६ महिने) तात्पुरर्ती नियुक्ती देणे कामी रु.१४,०००/- प्रत्येक कामगार प्रमाणे दरमहा सहा महिनेकरिता एकूण रु.१,६८,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना सहा महिन्याचा मुदतवाढीचा येणाऱ्या रु.१,६८,०००/- खर्चास व तात्पुरर्ती नियुक्ती देणेस तसेच मानसेवी कामगारांचे मानधन देणे करिता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकीय (रोजंदारी/मानधन) या लेखाशिर्षा अंतर्गत रु.१२ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार मुदत वाढीचा प्रस्ताव पाठविणेत आला असता स्थायी समिती ठराव क्रं.३५१ दि.०६/०८/२०२१ अन्वये वरील दोन्ही मानसेवी कामगारांची मुदत दि.२४/०८/२०२१ रोजी संपत असून उक्त मानसेवी कामगार यांना शासन निर्णयानुसार समान काम समान वेतन याप्रमाणे वेतन मिळणे आवश्यक असल्याने सदर कर्मचाऱ्यांना त्यानुसार वेतन देणे कामी प्रशासनाने प्रस्ताव तयार करुन दि.२४/०८/२०२१ पुर्वी स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी सादर करावा असा निर्णय घेणेत आलेला आहे.

स्थायी समिती ठराव क्रं.३५१ दि.०६/०८/२०२१ अन्वये आरोग्य विभागामार्फत दोन्ही मानसेवी कामगारांना समान काम समान वेतन नुसारची प्रक्रिया तसेच सन-२०२१-२२ चे किमान वेतन अधिनियम १९४८ च्या तरतुदीनुसार उदयोग उजा व कामगार विभागाच्या सफाईगार व मेहतर काम धंदा या अनुसूचीत उदयोगासाठी दि.२७ जानेवारी २०१७ रोजी मुळवेतनाबाबत काढण्यात आलेली अधिसूचना तसेच कामगार आयुक्त

कार्यालय मुंबई यांनी दि.०४/०८/२०२१ (कालावधी दि.०१/०६/२०२१ ते ३१/१२/२०२१) रोजी प्रसिध्द केलेल्या विशेष भत्ता दर पहाता सफाईगार किंवा मेहतर या अनुसूचीत उदयोगामध्ये महानगरपालिका क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना दरमहा खालील प्रमाणे वेतन देणे आवश्यक आहे.

| मुळ वेतन + | विशेष भत्ता + | ५%दरभाडे | एकूण |
|---|---|---|---|
| १०,०००/- | ३,९७८/- | ६९९/- | १४,६७७/- |

वरील प्रमाणे वेतनास २६ ने भागून येणारी रक्कम रु.५६४/- प्रती कामगार प्रतीदिन किमान वेतन किमान वेतनदर दिवस एकूण वेतन (मानधन) प्रतीदिन रु.५६४/- X ३० दिवस १६,९२०/- X २ कामगार ३३,८४०/- X ६ महिन्याकरिता एकूण रु.२,०३,०४०/- इतका खर्च येणार आहे.

स्थायी समिती ठराव क्रं.३५१ दि.०६/०८/२०२१ अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना पुर्वीच्या नियुक्ती मध्ये २ दिवसांचा खंड देवून दि.२७/०८/२०२१ ते दि.२६/०१/२०२२ पर्यंत (६ महिने) तात्पुरती नियुक्ती देणे कामी रु. १६,९२०/- प्रत्येक कामगार प्रमाणे दरमहा सहा महिनेकरिता एकूण रु.२,०३,०४०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- नाईक प्रशांत सुरेश**

**मा.सभापती :-** याच्याविषयी अजुन एक विषय आहे. कर्मचाऱ्यांच्या संबंधित आपण मागच्या वेळेस भाऊ हे
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अजुन दोन लोक वाढवायला लावले होते.
**मा.सभापती :-** व्हॉल्वमन जे आहेत. हे लोक तर वाढवायचेच आहेत.तो विषय राहीलेला आहे. मेलेले जनावरे उचलण्यासाठी पाटील साहेब , मेलेले जनावरे उचलण्यासाठी आपण आणखी लोकं वाढविणार कारण हे लोक कमी पडतात. आणखी वाढवायचे सांगीतले होते. त्यासाठी आपण केले ?
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय, सभापती महोदय, या विषयाला धरूनच आहे सभापती महोदय, आपण मागे एक वर्षापुर्वी स्थायी सभेमध्ये हा विषय घेतला होता की दोन माणसं कमी पडतात. चार माणसं करण्यात यावे आणि त्यांना ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्यात यावे. त्यावेळेला आरोग्यधिकाऱ्यांनी तसे स्पष्ट सभेमध्ये बोलले होते. दोनच लोकांकडुन काम जास्त होत नाही. आपल्या जळगांव शहराची ५ लाखांची लोकसंख्या आहे. तर दोन लोकं मानधनावर घेण्यात यावे आणि त्यांना नविन वाहने पुरविण्यात यावे. आज त्याला एक वर्ष झाले.या विषयाला तुम्हाला पुरावा पाहीजे तर रेकॉर्डींग काढा मागच्या स्थायी सभेचे त्याच्यामध्ये नमुद केलेले आहे आरोग्यधिकाऱ्यांनी.
**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ, संबंधीत आरोग्यधिकारी त्यांची तांत्रिक अडचण सांगितलेली आहे. मिटींग संपल्यानंतर आपणास वाटल्यास आपण चर्चा करु आणि त्याच्यावर निर्णय घेऊ.
**श्री.सुशिल साळुंखे :-** जी माहिती लागणार होती ती घेतली आता आस्थापना विभागाकडुन लवकरात लवकर करतो.
**मा.सभापती :-** लवकर करा.
**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा विभाग प्रमुख :-** हो झालेले आहे ते आता अंतीम टप्यात आहे.
**मा.सभापती :-** हे बघा, मिटींग मध्ये उत्तर दिले फक्त त्याला उपयोग नाही. काम झाल्याचे सांगितले पाहिजे की, काम झाले म्हणुन.
**श्री.सुशिल साळुंखे, पाणी पुरवठा विभाग प्रमुख** :- क्युरी होती फार मोठी आता पर्यंत माहिती घ्यावी लागली. माहिती घेतली आता तेच पुटअप करायचे आहे.
**मा.सभापती :-** लवकर करा ते.
**श्री.नितीन लढ्ढा :-** राजु भाऊ.
**मा.सभापती :-** बोला भाऊ.
**श्री.नितीन लढ्ढा :-** शहरातील विद्रुपीकरणाच्या बाबतीत, राजनितीक जी अनधिकृत फलक लावली जातात. त्याच्यावर प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे. परंतु एखादी व्यक्ती या संदर्भातील तक्रार करेल आणि प्रशासनाने त्याची दखल घ्यावी. आणि नंतर कार्यवाही करावी. या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने सुध्दा यापुर्वी निर्णय दिलेले आहे. जी उरलेली राजकीय फलक असो की, सामाजिक फलक असो. हे विनापरवानगी लावुन जर शहराचा

विद्रुपीकरण होत असेल. तर फलक संबंधीत असलेल्या व्यक्तीं विरुध्द सुध्दा कार्यवाही करणेचे निर्देश मा.हायकोर्टाने दिलेले आहे. मला वाटते या संदर्भात मोहिम जी आहे या मोहिमीमध्ये सातत्य ठेवणे खुप अपेक्षित आहे. कारण काय आहे की, अश्या पध्दतीने कोणी तक्रार केल्यानंतर प्रशासनाला जाग येते ही गोष्ट काही योग्य नाही. आज आपण बघतो, महानगरपालिकेच्या आवारात म्हणजेच महापालिकेच्या दक्षिणी भागात असलेल्या डिव्हायडरवर किंवा आपला महापालिकेचा प्रवेश सुरु होतो त्या प्रवेशावर विविध राजकीय पक्षांचे विविध सामाजिक संघटनांचे अश्या पध्दतीने फलक लागतात, मला वाटते की, अश्या फलकांना बंदी करावी. महानगरपालिकेच्या समोरच असलेल्या डिव्हायडरमध्ये फलक लावणे करीता कुठल्याही प्रकारची कायदेशीर परवानगी सुध्दा देण्यात येऊ नये. कारण ज्या गोष्टींचा कायदा शहर विद्रुपीकरणाचा जो विषय आहे. आज आपण बघतो, स्वातंत्र चौक, काव्यरत्नावली चौक, हे आपण विकासकांना विकासासाठी दिले होते त्यावेळेला अटीशर्ती दिलेल्या होत्या त्यांच्या करारनाम्यामध्ये की, सदरहु चौक हे आम्ही आमच्या कंपनीच्या माध्यमातुन सुशोभिकरण करतो, त्या ठिकाणी कुठल्याही जाहिराती किंवा राजकीय फलक लावण्यात येऊ नये. परंतु कुठेतरी राजकीय पदाधिकारी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन त्याच ठिकाणी तश्या पध्दतीने फलक लावतात आणि ते वाहतुकीला ही अडथळे होतात. शहराचे सुंदरतेचे ही विद्रुपीकरण जाहिरातींच्या होर्डिंग्स मुळे होत असतं. तर माझी विनंती आहे की, जी चौक आपण ज्या अटीशर्तीवर दिलेले आहे. तेथे सुध्दा अश्या प्रकारच्या जाहिरातीचे फलक लावणे कुठलीही परवानगी देण्यात येऊ नये. आणि अश्या पध्दतीने जिथे जिथे बेकायदेशीर फलक लागलेले असतील. तश्या फलकांना सुध्दा तातडीने त्याच्याबाबतीत गुन्हे दाखल करण्याच्या सुचना प्रशासनास देण्यात याव्या. आणि राजु भाऊ आपण मंदिर आणि धार्मिक स्थळांच्या २०० मिटर वरती सुध्दा आणि महापुरुषांच्या पुतळयापासुन सुध्दा २०० मिटरच्या अंतरापर्यंत अश्या पध्दतीचे फलक लावण्यात येऊ नये. या पध्दतीचे ठराव सुध्दा पारित केलेले आहे. तरी आपण बघतो शिवाजी महाराजांच्या पुतळया जवळ किंवा दुसरे कोणी महापुरुष असतील त्यांच्या पुतळयाजवळ म्हणा, अश्या पध्दतीने जाहिरातीचे फलक लावुन शहर विद्रुपीकरणाच्या कायद्याचा आणि मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान याच्यामध्ये होत आहे. तर प्रशासनाने याबाबींची गंभीर दखल घेऊन शहरामध्ये कुठेही राजकीय पदाधिकारी असो किंवा पुढारी असो. कुठलीही लापरवाई न करता सरळ यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे.

**मा.सभापती :-** नक्की भाऊ, शहराचा विदरुपीकरण होतो. त्यासाठी आपण कठोर कार्यवाही केली पाहिजे पण त्याच्यासाठी प्रशासनाला आपले सर्व लोकप्रतिनिधींच्या सहकार्याची आवश्यकता आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नक्की जर नितीन लढ्ढांचाही बोर्ड दिसेल तर त्याच्यावर ही कार्यवाही करा त्याच्यावर ही गुन्हे दाखल करा.

**मा.सभापती :-** प्रशासन तिकडे कार्यवाही करेल आणि तेथे एखाद्याचा फोन येतो. मग हे आमचे कार्यकर्ते आहे त्यांचे हे काढु नका. त्यांच्यावर गुन्हा दाखल करु नका. त्याच्यासाठी आपले सहकार्याची आवश्यकता असेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** असे फोन आले ना की, सर्व रित्या त्या फोनची रिकॉर्डींग वृत्तपत्रांच्या माध्यमातुन वायरल करुन टाकायची. म्हणजे जेणे करुन लोकलाभीने का होईना भविष्यात अश्या कामांसाठी कोणी फोन करणार नाही. आणि महानगरपालिका अश्या बाबतीत कठोर कार्यवाही करते. हा संदेश या होर्डींग लावणाऱ्या व्यक्तींपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. कारण की, त्यांच्या ज्या पदाधिकाऱ्यांकडे ज्या चुकीच्या अपेक्षा असतात. आणि पदाधिकाऱ्यांना मतांसाठी त्या नागरीकांच्या दृष्टीकोणातुन फोन लावणे ते ही कदापी संयुक्तीक नाही.

**मा.सभापती :-** नक्कीच भाऊ परंतु मला असे वाटते, आता जी कार्यवाही झाली, जी आपण म्हणतो की, RTI कार्यकर्ते यांनी तक्रार केली होती. त्या अनुषंगाने आपण कार्यवाही केली. पण त्यामध्ये काही नागरीकांनी परवानगी घेऊन त्यांच्या होर्डींग लावलेले होते. ते होर्डींग सुध्दा काढले गेलेले आहे अशी माझ्याकडे तक्रार आलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही पण मी काय म्हणतो, असे जी काही आपल्या महानगरपालिकेच्या समोरच्या भागामध्ये येथे तर कायदेशीर रित्या सुध्दा परवानगी देण्यात येऊ नये. म्हणजे आज आपली प्रशासकीय इमारत आहे आणि प्रशासकीय इमारतीच्या समोरच अश्या पध्दतीचे वेडेवाकडे होर्डींग लागलेले असतात. भलेही ती कायद्याने घेतलेली परवानगी असेल त्याबद्दल दुमत नाही. परंतु कायदेशीर रित्या सुध्दा अश्या परवानग्या सरळ सरळपणे नाकारण्यात याव्या.

**मा.सभापती :-** नक्की समजा आपला महापालिकेचा परिसर असेल, शालेय संस्था असतील. काही बगिचे असतील, धार्मिक स्थळे असतील. जेथे रहदारी मोठया प्रमाणावर असते.आणि ते रहदारीला अडथडे निर्माण करतील असे ठिकाणी होर्डींग लावायला परवानगीच देता कामा नये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी चौक आपण ज्या संस्थांना दिलेले आहे. त्या संस्थ्यांच्याबाबतीत पण तोच अनुभव येतो की, तेथे वेगळया संस्था येवुन आपले होर्डींग लावुन टाकते. मग त्या चौकाच्या सुशोभिकरणावर केलेला खर्च तो वाया जातो. आणि त्या सुशोभिकरण करणाऱ्यांना अनावस्था जाहिर होते. असा जर लागला तर आपण स्थायी मध्ये ठराव पारीत करुन घ्या.आणि सर्वानुमते तो ठराव पारीत करुन घ्या. त्या निर्णयाची प्रशासनाने काटेकोरपणे अंमलबजावणी करेल. अश्या पध्दतीने सुचना देऊन टाका.

**मा.सभापती :-** आपण आज सुचना देऊ शकतो भाऊ. ठराव करायचे म्हटले तर आपण ते विषयपत्रिकेवर घेऊन आपण ठराव करु.

श्री. नितीन लढ्ढा :- घ्या ना आपण पुढच्या मिटींगला तसा ठराव घ्या.

**मा.सभापती :-** हो चालेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो. परंतु प्रशासनाला तश्या पध्दतीच्या सक्त सुचना द्या.

**मा.सभापती :-** प्रशासनाने काळजी घ्यावी. जी चर्चा झाली त्या प्रमाणे अंमलबजावणी झाली पाहिजे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, मला एक विषय मांडायचा होता.

**मा.सभापती :-** बोला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपण स्थायीच्या तिसऱ्या मिटींगच्या अगोदर, एक सिक्युरीटीच्या कंत्राटच्या बाबतीमध्ये आपण त्याला जो पर्यंत नविन टेंडर होत नाही तो पर्यंत त्याला काम करण्यासाठी संधी दिलेली होती. मला त्या जो कोणाकडे ते आहे. त्यांना बोलवुन विचारा की, आता पर्यंत किती प्रोसेस झाली. आता करंट स्टेटस काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुलभुषण भाऊ मधेच कुठे चालले गेले.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ, सगळी चर्चा चालु होती. मग मध्ये मी काही बोललो नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हटले, आज सुर्य थोडा उशिरा का उगविला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही, नाही भाऊ, चालु आहे तुमची चर्चा आणि सगळ व्यवस्थित चालु होते म्हणुन मी काही बोललो नाही मध्ये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुमचे मार्गदर्शन या सभागृहाला उपमहापौर म्हणुन अपेक्षित असतो ना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही, आपण आहे सर्वांचे मार्गदर्शनासाठी, आपण बोलले म्हणजे आम्ही सगळे बोलले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही, तुमचा मोठेपणा आहे तो.

**श्री.कुलभुषण पाटील :-** बोला भोसले साहेब,

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** मा.स्थायी समितीच्या ठरावाच्या अनुषंगाने टिप्पणी सादर करण्यात आलेली आहे. मुख्यलेखा परिक्षकांचे अभिप्राय झालेले आहे त्याच्यावरती, आयुक्तांकडे सादर झालेली आहे. एकदा चर्चा झाली याबाबतीत आणखी सविस्तर मिटींग होणार आहे या विषयावर.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भोसले साहेब, आता मला सांगा सिक्युरीटीच्या बाबतीत मला असे वाटते, आपण एक ३ महिने अगोदर. ३ महिने पेक्षा मला वाटते जास्त झाले असतील. आपण त्याला ११ महिनेसाठी ज्या सिक्युरीटीचा काम दिलेले होते. ११ महिन्याच्या मुदतीसाठी त्याला काम दिलेले होते.तसेच आपण कोविडसाठी एक काम दिलेले होते. मला सांगा या लोकांची मुदत संपणे अगोदर आपण प्रशासन त्या विषयाचे प्रस्ताव तयार का नाही करत. म्हणजे त्या ठेकेदाराला आपण पाठीशी घालण्याचा काम करतो का ? बरं दोन मिटींग मगाच्या मटींगमध्ये सुध्दा सन्मा.सदस्य नितीन भाऊंनी आणि सर्व सन्मा.सदस्यांनी या बाबतीमध्ये प्रशासनावर रोष व्यक्त केला होता.

**मा.सभापती :-** कुलभुषण भाऊ, आपण निविदा प्रक्रिया राबविण्या संदर्भात सुचना केलेल्या होत्या. त्या बद्दल साहेबांना माहिती देऊ द्या आधी.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** मक्तेदाराने किमान कायदेनुसार दर दिलेले आहे. आणि ते दर निविदा समिती समोरपण मान्य झालेले होते. त्या अनुषंगाने स्थायी समितीने प्रस्ताव दिलेला होता, आता स्थायी समितीने प्रस्ताव नामंजुर केलेला आहे आणि मक्तेदाराने पत्र दिलेल आहे की, मी कोर्टात तक्रार दाखल करेल. माझे दर कमी असतांना मला कार्यादेश का देण्यात येत नाही. या बाबतीत हा विषय असल्या कारणाने आयुक्त साहेबांकडे ती चर्चा होणे बाकी आहे.

**मा.सभापती :-** मला सांगा साहेब, त्यांची मुदत कधी संपलेली होती.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ४ महिने अगोदर.

**मा.सभापती :-** मुदत संपली त्यांची त्याची माहिती द्या.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** मुदत नोव्हेंबर डिसेंबरला संपली होती.

**मा.सभापती :-** नोव्हेंबर डिसेंबर, आपण किती दिवसासाठी कॉंट्रॅक्ट देणार होतो.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ दिलेली होती.

**मा.सभापती :-** नाही नाही. ती मुदत संपल्यानंतर,

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** एक वर्षासाठी ती निविदा काढली.

**मा.सभापती :-** समजा आपली ती मुदत दिल्यापासुन मुदत कधी संपणार. निविदेची.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** डिसेंबर अखेर पर्यंत,

**मा.सभापती :-** कोणता डिसेंबर.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** डिसेंबर २०२१

**मा.सभापती :-** डिसेंबर २०२१ आता कोणता महिना चालु आहे.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** सप्टेंबर चालु आहे आता.

**मा.सभापती :-** किती दिवस बाकी आहे आता ती मुदत संपायला.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** नविन टेंडर प्रसिध्द करण्याचा आपल्या टिप्पणीत नमुद केलेले आहे तसे. त्याच्यावर निर्णय होणे बाकी आहे.

**मा.सभापती :-** नाही, किती दिवस बाकी आहे ते सांगा मला.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** ३.५ महिने बाकी आहे.

**मा.सभापती :-** ३.५ महिने जर आपण त्या वेळेस निविदा प्रक्रिया राबविली असती. तर त्यांची आता ३.५ महिन्याने मुदत संपली असती. तो पर्यंत आपली त्याच्यावर प्रक्रियाच चालु आहे त्याच्यावर निर्णयच होत नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, मला याच्यात असे सांगायचे आहे. आपल्या निर्दशनास देखील आणुन द्यायचे आहे. प्रशासनाचा हा जो धिम्म कारभार आहे. त्याला कुठेतरी जाब बसला पाहिजे. हे काय आहे माहिती आहे का ? ज्या ठेकेदाराला आपण ११ महिन्यासाठी काम दिलेले आहे .तोच ठेकेदार २-२ वर्षापर्यंत काम करत असेल.

**मा.सभापती :-** मुदतवाढीवर मुदतवाढीवर ती मुदतवाढ मिळत राहते आणि त्याचा जो मिळणारा काळ आहे. ते ११ महिनेसाठी देतो त्याच्या आत मध्येच ती ११ महिने मुदत होऊन जाते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आणि त्या ठेकेदाराला पाठीशी घालुन आता तर मला असे वाटायला लागले की, त्याच्यामध्ये कोणी पार्टनर आहे. आणि हे महानगरपालिका लुटण्यासाठी बसलेले आहे असे मला एकंदरित वाटायला लागले आहे. ज्या ठेकेदाराला ११ महिन्यासाठी काम दिलेले असते. तो ठेकेदार तुमच्याकडे २४-२४ महिने काम करतो. आणि अजुन वरतुन धमकी देतो की, मी कोर्टात जाईन. ही कुठली पध्दत आहे कसा काय कोर्टात जाईन. त्याची मुदत जर संपलेली आहे तर मुदत संपल्यानंतर तो कसे काय कोर्टात जाईन.द्या ना त्याला उत्तर तुझी मुदत संपलेली आहे. चल बाहेर निघ. तु काम करण्यास अपात्र झालेला आहे. कोर्टात कसा जाईन.

**मा.सभापती :-** कोर्टात जायचा काय विषय आहे.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** त्याचे दर समान वेतन कायद्यानुसार दिलेले असल्याने तो लोएस्ट येत आहे.

**मा.सभापती :-** पण आपण त्याला ऑलरेडी तेवढी मुदत देऊन टाकलेली आहे ना.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** ती मागच्या वर्षाची होती ही चालु वर्षीची आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** कोणत्या निविदा प्रक्रियेमध्ये म्हणता हो.

**मा.सभापती :-** त्याच काम थांबवुन टाका दुसऱ्याला काम द्या.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही, नाही, सभापती महोदय ऐका ना, याच्यात विषय असा आहे की, जरी तो किमान वेतननुसार जरी काम करीत असला, तर त्याला आपण ऑनलाईन पध्दतीने काम दिले होते की, ऑफलाईन पध्दतीने काम दिले होते पहिले मला हे सांगा तुम्ही.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** ऑनलाईन पध्दतीने देलेले होते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** तुम्हाला या टेन्डर मध्ये सर्व प्रोसेस काय झालेली आहे माहिती आहे का ? पुर्ण पुर्ण प्रोसेस माहित आहे का ?

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** पुर्ण तर माहित आहे ना काय ते कश्या बाबतीत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ही प्रोसेस कशी झाली. किती महिन्यासाठी झाली, ऑनलाईन झाली, किमान वेतनानुसार त्यानी काम केल का ? त्याच्यानंतर त्यानी काय काय पत्र व्यवहार केले. किती वेळेस मुदतवाढ दिली, स्थायी समितीत हा विषय कितीदा आला. त्यानंतर याच्यावार काय चर्चा झाली. पुन्हा त्याला मुदतवाढ किती दिवसासाठी दिली. आणि आपण नविन प्रक्रिया कधी करणार आहे. या सगळयाबाबतीत आपल्याला माहिती आहे का ?

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** माहिती आहे पुर्ण पणे संचिका पाहुन सांगतो वाटल्यास, पुढच्या मिटींगला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हाच मोठा प्रॉब्लेम आहे. आपल्या प्रशासनाचा आपण वेळेत कुठलेच कामे करत नाही.आणि वेळेत कुठलेच कामे करत नसतांना आपली महानगरपालिकेचे वर्षानुवर्ष हे जे नुकसान होत आहे. या नुकसानाला जबाबदार जे शहरातील नागरीक आहे. हे प्रशासनाला जबाबदार नाही धरत हे त्या प्रभागातुन निवडुन

आलेले किंवा जळगांव शहरातुन निवडुन आलेले सर्व सन्मा.सदस्य आहेत. या शहरवासीयांचा रोष इन्डायरेक्टली त्यांच्यावर जातो.आणि याचा आम्ही वारंवार सभागृहामध्ये स्थायी समिती मध्ये प्रशासनाला वेळोवेळी लक्षात आणुन देतो. परंतु आपला प्रशासन इतक्या गेंडयाच्या कातडीचा आहे की, आपल्याला या सर्व गोष्टींची एक किंचीत भर सुध्दा देखील फरक पडत नाही. आणि या सर्व गोष्टींचा त्रास आम्हाला सोसावा लागतो. लोकं आम्हाला बोलतात. मला सांगा याच्यामध्ये सन्मा.नितीन भाऊ सेम पध्दत सिक्युरिटीची झालेली आहे, सेम पध्दत आपल्या कोविडच्या कामामध्ये झालेली आहे. जे जे काही आपल्या महानगरपालिकेमध्ये टेन्डर झालेले आहेत. भाऊ मला एक समजत नाही. जी लोक ज्या टेन्डरची प्रोसेस पुढच्या महिन्यात संपणार आहे समजा, जानेवारी मध्ये संपणार आहे समजा, हे डिसेंबर मध्ये त्याचा डॉकेट तयार करुन महासभेसमोर किंवा स्थायी समिती सभेसमोर का नाही आणत की, हे पुढच्या महिन्यात त्याची मुदत संपणार. याच्याबाबतीत आपल्या किंवा सभागृहाला काय निर्णय घ्यायचा आहे. टेन्डर प्रोसेस संपण्या अगोदर हे का निदर्शनास आणुन देतात सभागृहाच्या.भाऊ मला सांगा, वारंवार ज्या ठेकेदाराची ११ महिन्याने मुदत संपणार आहे. तो २४ महिने पर्यंत वारंवार मुदतवाढ घेऊन काम करत आहे. सेम पध्दत गाळेधारकांच्या बाबतीतली झालेली आहे. त्यांनी मुदतवाढ देऊन मुदतवाढ देऊन आज आपल्या छातीवर ते बसलेले आहे. हे तेच पत्र संबंधीत ठेकेदाराने दिलेला आहे की, मी कोर्टात जाईन. म्हणजे भाऊ त्याने काम वेळेवर केल्यानंतर त्याला मुदतवाढ द्यायची. आणि उद्या उठुन त्यानीच आपल्याला सांगायचे की, मी तुमच्या विरुध्द कोर्टात जाईल. म्हणजे भाऊ याच्या मध्ये मला सांगा. नुकसान कोणाचा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ये तो, उलटा चोर कोतवाल को डांटे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** उलटा चोर कोतवाल को डांटे. मग हे भाऊ, प्रशासन अश्या पध्दतीने काम करत असेल. आणि वारंवार सर्व सन्मा.सदस्य या बाबतीमध्ये रोष व्यक्त करीत असतील आणि प्रशासन त्या संबंधीत लोकांवरती, अधिकारी कर्मचाऱ्यांवर काही कार्यवाही करत नसेल. तरी भाऊ यांचा रोष आपण का सहन करायचा यांच्यामुळे

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय ही निश्चितपणे गंभिर बाब आहे. आपण बघा, आपण स्वत: अनुभव घेतला असेल की, या विषयावर अनेक वेळी चर्चा झाली. आणि प्रत्येक वेळी हाच की, ज्या वेळेला आपल्याला माहित असत की, त्या मक्तेदाराची मुदत केव्हा संपुष्टात येणार हे आपल्या नॉलेजला असत, तरी सुध्दा जाणीवपुर्वक विलंब होतो का ? अशी शंका घेणे हे क्रमप्राप्त होते की, एखादी मुदत संपलेली आहे हे माहिती आहे आपल्याला, तरी सुध्दा आपण विहित कालावधीमध्ये निविदा प्रक्रिया सुरु करत नाही. आणि नविन मक्तेदाराला संधी उपलब्ध करुन देत नाही. म्हणजे जुन्या मक्तेदाराशी काही लागीबांधी आहे का ? तर असे याला वेगळा पुरवा देण्याची गरज सुध्दा वाटत नाही. गंभिर बाब आहे ही भोसले साहेब,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नितीन भाऊ, हे असे वाटते आम्हाला की, ४ मिटींग झाल्या.

**श्री.कुलभुषण पाटील :-** बरं मला सांगा, याच्यामध्ये तुम्हाला कोणाचा दबाव आहे का ? मी भोसले साहेबांबाबत नाही म्हणत आहे. प्रशासनावरती दबाव आहे का असे करण्यात येऊ नये म्हणुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक्झ्याक्ली, एक्झ्याक्ली,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कुलभुषण भाऊ आपण फक्त बोलायचेच

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** सुरक्षा रक्षक बंद करण्याची त्वरीत टिप्पणी सादर केलेली होती. स्थायी समितीच्या ठरावाच्या अनुषंगाने टिप्पणी सादर केलेली होती. परंतु सद्या कर्मचारी उपलब्ध नसल्या कारणाने सुरक्षा रक्षक बंद करणेस अडचण निर्माण झालेली आहे. अशी मा.आयुक्त साहेबांकडील बैठकीत चर्चा झालेली आहे.

**मा.सभापती :-** साहेब, मागच्या मिटींग मध्ये सर्वानुमते निर्णय घेण्यात आला होता की, ही नविन निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. तुम्ही आज जे सांगत आहे त्यावेळेस का नाही सांगितल्या या अडचणी. ही जी आज अडचण सांगत आहे मागच्या वेळेस सांगितली का ? आणि आज ही तुम्ही अडचण सांगत नाही. फक्त आयुक्त साहेबांकडे चर्चा होणार आहे. हे तर कुलभुषण भाऊंनी मांडले. आज ही क्लियर करत नाही तुम्ही की, त्याला काही तांत्रिक अडचण आहे का ?

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** तांत्रिक अडचण येत आहे या प्रकरणात.

**मा.सभापती :-** तुम्ही सांगा ना. काय तांत्रिक अडचण आहे.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** किमान वेतन दर जो दिलेला आहे तो मक्तेदार बसत आहे त्याच्यात.

**मा.सभापती :-** मला सांगा निविदा राबविल्यानंतर स्थायी समिती किती दिवसांनी आला हा विषय? त्याला काही टाईम लिमिट आहे की नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** तो उत्तर हे दिन की, तो १ पैश्याने दर कमी टाकतो आहे.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** निविदा समितीच्या निर्णयानंतर लगेच पाठविली आम्ही.

**मा.सभापती :-** डिसेंबर पासुन मग आम्ही निर्णय घेत नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कुलभुषण भाऊ आवाज येत नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हा प्रशासनाचा कोणता कारभार आहे. मला वाटते की, कायदा तर सर्वांसाठी सारखा आहे ना. तुम्ही नेहमी नेहमी तेच सांगता, महानगरपालिकेमध्ये जे निविदेचा फेरफार आहे. १ पैश्याने तुम्ही काम करतात. त्याच लोकांना तुम्ही पाठीशी घालतात. आणि इतर निविदा राबवितांना ते रु.२ ने रु.६ ने रु.१० ने काही निविदा रु.१०० ने देतो. मग ऐकासाठी एक कायदा आणि दुसऱ्यासाठी एक कायदा असे का?

**मा.सभापती :-** भाऊ आयुक्त साहेब आले की, आपण सर्व तेथे जाऊन आयुक्त साहेबांशी चर्चा करुन तात्काळ निर्णय घेऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती माझी आपल्याला आणि सर्व सभागृहाला देखील विनंती आहे की, या पध्दतीने कामकाज चालत असले तर तुम्ही असो किंवा आम्ही असो. लोक आपल्याला शिव्या घालणार आहे आणि लोकांच्या सामोरे आपल्याला जावे लागतात.

**मा.सभापती :-** कसे आहे कुलभाषण भाऊ, भोसले साहेब सांगत आहे. आयुक्त साहेबांकडे ही चर्चा होणार आहे. आज आपण आयुक्त साहेब नसणार आपण त्याच्याकडेस आपण याच्यावरती वेळ घालविण्यापेक्षा आपण त्याच्याकडे जाऊन ताबडतोब निर्णय घेण्यास भाग पाडु.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती साहेब माझा म्हणायचा अर्थ भोसले साहेब नाही, माझे म्हणायचा अर्थ प्रशासन आहे. भोसले साहेब ह्या एक विषयात आहे मी अजुन दुसरा विषय उपस्थित केला. मला सांगा तुम्ही योगेश बोरोलेंना बोलवा. त्या आपल्या अन्डरग्राऊंड ड्रेनेजच्या बाबतीत ही बोलायचे आहे मला.

**मा.सभापती :-** बोला ना, सांगा ना मांडा काय विषय आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मला त्या अन्डरग्राऊंड ड्रेनेजच्या बाबतीत ही माहिती पाहिजे.जर आपण त्या योगेश बोरोलेंना बोलविले तर बरं होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुलभुषण भाऊ, आज योगेश बोरोले नाही. ते मुंबईला आयुक्तांसोबत ती अंदाजसमितीची मिटींग आहे ना. त्याच्यामध्ये आयुक्त साहेबांची साक्षी आहे.म्हणुन मुंबईला गेलेले आहे. मला वाटते की, त्यांना आले की आपण बोलुन चर्चा करा आणि काही आक्षेपाचे मुद्दे असतील तर निश्चितपणे आपण त्याच्यावर चर्चा करु या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, मला बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** बोला भाऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** डेंग्युच्या संदर्भात मागील ८ महिन्यापासुन पावसाळयापुर्वी आम्ही सांगितले तुम्हाला, त्यासाठी तुम्ही काय उपाययोजना केली आहे.

**मा.सभापती :-** डेंग्युचे विभाग प्रमुख आलेत का ?

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** नमस्कार आपल्या शहरामध्ये डेंग्यु संदर्भात जो आपण काम सुरु केलेला आहे. ऍक्व्युली डेंग्यु हा जो आजार होतो. हा फक्त स्वच्छ पाण्यामध्येच त्याची मादी असते.ही मादी पाण्यामध्ये असल्यानेच स्वच्छ पाण्यामध्ये अंडी घालते.

**श्री.प्रशांत नाईक :-** काहीच सांगु नका पाटील साहेब.

**सौ.ज्योती चव्हाण :-** फवारणी केव्हा करत आहे ते सांगा.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** पहिले मी पार्श्वभूमी सांगतो मग सांगतो.

**श्री.प्रशांत नाईक :-** काही पार्श्वभूमी सांगु नका.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुम्हाला मी अगोदर बोललो होतो की, डेंग्युच्या फवारणीचे टेन्डर काढा. फॅगींगचे टेन्डर काढा. काय उपाययोजना केल्या तुम्ही.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ तुमची ऑनलाईन रेकॉर्डीग होत नाही म्हणुन ते रिकॉर्डवर येणार नाही. तुम्ही थोडे बाहेरुन बोला. येथे डिस्टर्ब होतो. तुमचा रेकॉर्डीग होणार नाही रिकॉर्डवर येणार नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** चला पाटील साहेब चालु करा.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** आपल्या शहरात ४२९ असे मोठ मोठे डबके आहे. त्यामध्ये वेस्टॉल टाकलेले आहे. जेणे करुन त्याचे उत्पादन होणार नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** किती डबके आहेत.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** ४२९ डबक्यांवर आम्ही हे केलेले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** कुठे कुठे आहे ते ४२९ डबके. सांगा.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** शहरामध्ये आहेत ना भाऊ बरेच डबके आहेत.

**श्री.प्रशांत नाईक :-** कुठे कुठे आहे. सांगा.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** शिवाजी नगर असेल, पिंप्राळा असेल, मेहरुण असेल. लहान मोठे डबके भरपुर आहेत.

श्री.प्रशांत नाईक :- मेहरुण मध्ये कुठे आहे डबके ?

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** आहे ना रेकॉर्ड आहे आमच्याकडे सर्व. आम्ही ऑईल टाकतांना फोटो ही काढलेले आहे आणि तसेच आम्ही १० x १० चे १० बॅनर्स लावलेले आहे चौकांमध्ये की, डेंग्यु होऊ नये म्हणुन काय काळजी घ्यायची नागरीकांसाठी.

श्री.कुलभुषण पाटील :- डॉक्टर साहेब, मला या ठिकाणी उत्तर असा द्या. काय केले.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** आपण अपेटींग केले आहे.

श्री.कुलभुषण पाटील :- पाटील साहेब, सभापती महोदय, मला सांगा नवनाथ भाऊंनी तुम्हाला डेंग्युची फवारणीसाठी किंवा डेंग्यु बद्दल उपाययोजना करणेबद्दल पत्र कधी दिले होते. आवाज येत आहे का ?

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** आम्ही जवळ जवळ १ लाख १९ हजार घरे पर्सनली जाऊन म्हणजे कर्मचाऱ्यांनी त्या घरांमध्ये पाण्याची भांडे जी रिकामे करायचे होते ती रिकामे केले. जे करता येत नव्हते त्याठिकाणी अबेट टाकले.

श्री.कुलभुषण पाटील :- पाटील साहेब.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** भाऊ तुम्ही मला विचारले काय कार्यवाही केली, सांगतो आहे ना आता. त्या १ लाख १९ हजार घरांचे आमच्याकडे रेकॉर्ड पण आहे. आम्ही पॉमप्लेट पण वाटले की, डेंग्यु कसा अपटुन यायला पाहिजे. हा स्वच्छ पाण्यातच होतो, बाहेरच्या गटारीच्या पाण्यामध्ये किंवा घाण पाण्यामध्ये डेंग्युची मादी अंडे घालत नाही.त्यामुळे आम्ही जी कार्यवाही करायची बेसीक कार्यवाही मुळ कार्यवाही की, अंडे पासुन मच्छर होऊ नये.
श्री.नितीन लढ्ढा :- डॉक्टर साहेब, १ लाख १९ हजार घरांवर जी पाहणी केली, तुम्ही स्वत: प्रत्यक्ष जाऊन किती घरांची पाहणी केली.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** भाऊ, १०० ते १५० घर मी स्वत: पाहिले. माझ्याकडे फोटो पण आहे. १ लाख १९ हजार घरांमध्ये तुम्ही फक्त १०० घरांना भेटी दिल्या.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** भाऊ रॅनडमली केली, म्हणजे मोहन नगर भाग असेल, अजय नगर असेल,

**श्री.नितीन लढ्ढा :-** अरे त्या १०० मधील फक्त कमीत कमी ८० नगरसेवकांच्या घरी गेले असते तर त्यांना कळले असते की, पाटील साहेब कुठेतरी कार्यरत आहे.

**मा.सभापती :-** कुलभुषण भाऊ, काही आपल्या सुचना असतील तर ते सांगा म्हणजे त्याची अंमलबजावणी करता येईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** माझी सुचना घेऊन घ्या.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ तुमच्याही सुचना मांडा.

**श्री.प्रशांत नाईक :-** माझी सुचना घेऊन घ्या. स्वच्छ पाणी घरात ठेवु नका, गढुळ पाणी घरात ठेवा डेंग्यु ऑटोमेटीक गायब होणार आहे. असे पाटील साहेबांचे म्हणणे आहे. त्याचे पालन करावे सर्वांनी आपले जळगांव जिल्ह्याचे अधिकारी आहेत ते आपले आरोग्याधिकारी आहे. स्वच्छ पाणी घरात ठेवु नका, गढुळ पाणी ठेवा म्हणजे डेंग्यु गायब होणार आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय, मला यांना हेच विचारायचे आहे. पावसाळयाच्या पहिले मी तुम्हाला लेखी पत्र दिलेले होते. पावसाळा चालु होतो त्या करीता डेंग्युच्या संदर्भात आपल्या उपाययोजना तयार करण्यात याव्या. पावसाळा होत आला आता संपत आला. काही उपाययोजना केल्या नाही. डेंग्युचे पेशन्ट सापडतात तेव्हा ते फवारणी आयोडीन पाठविता, तुमच्याकडे कर्मचारी नाही. कर्मचारी कसे उपलब्ध करायचे काय करायचे प्रशासनाने ते बघायचे. आम्हाला नागरीकांना सुविधा पाहिजे.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** बरं भाऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आठ महिने झाले तुम्ही काय करत आहे त्या विषयावर. तुम्ही सांगत आहे टेन्डर काढत आहे. टेन्डर प्रोसिजर फाईल गेली. वाहुळे साहेबाकडे गेली आहे. गोसावी साहेबांकडे गेलेली आहे. एक म्हणता ते रोनवाल की, सोनवाल त्याच्याकडे गेली. मग आम्ही हेच उत्तरे ऐकायचे का ? आणि नागरीकांच्या रोषाला सामोरे जायचे का? आता तुम्ही कोविडच्या धरतीवर कोरोना कधी वाढला या डेंग्युमुळे सदर तुमचे मागचे पुढचे सगळे

पगार जमा करण्यात यावे. हे मी डायरेक्ट आरोप करतो यांच्यावर. आज डेंग्युचे पेशन्ट किती आहे यांनी सांगावे नाही तर मी यांना रेकॉर्ड देतो.

**सौ.ज्योती चव्हाण :-** रेकॉर्डवर सांगा ना, किती डेंग्यु पेशन्ट आहे. त्यांच्याकडे रेकॉर्डच नाही.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** आहे आहे मॅडम, २६२

**सौ.ज्योती चव्हाण :-** अहो, खाजगी रुग्णालयातुन तुम्ही आणले आहे का रेकॉर्ड.सांगा बरं कोणत्या खाजगी रुग्णालयात गेले तुम्ही. माझी स्वत:ची मुलगी ॲडमिट होती डेंग्युने आहे का तुमच्या रेकॉर्डवर. सांगा आहे का रेकॉर्डवर.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** डी.एम.ओ. ऑफिस कडुन आमच्याकडे नावे येतात. सदृश्य म्हणुन नॉट डेंग्यु.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मग त्या डॉक्टरांनी उगाच पैसे घेतले का ६ दिवसांचे.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** मॅडम, मी पण डॉक्टर आहे म्हणुन म्हणतो. ते सदृश्य आहे. नॉट कन्फर्म.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सदृश्य आहे म्हणजे. आपण ब्लड चेक केले. त्याच्यात डेंग्यु पॅझिटीव्ह म्हणुन आले म्हणुन आपण ॲडमिट झालो. मग तुमचे म्हणणे काय आहे की, तो डेंग्यु नव्हता.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** डेंग्यु सदृश्य असतो. डेंग्यु नाही. म्हणुन उपचार तेच असेल.

**सौ.ज्योती चव्हाण :-** अहो आज खाजगी रुग्णालयात मुलांना ॲडमिट करायला जागा नाही इतके रुग्ण आहे. आणि खुशाल प्रशासन म्हणते आमच्याकडे रुग्ण नाही. तुम्ही सदृश्य असेल त्यालाच डिक्लेअर कराल. हे असे सदृश्य अदृश्य जावु द्या. तुम्ही फवारणी करा नागरीकांच्या घरांमध्ये ते महत्वाचे आहे.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** ठिक आहे ताई.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता पाऊसाळयात फवारणी चालु आहे का ?

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** चालु आहे फवारणी चालु आहे. परत स्पीड वाढवु आता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** डेंग्यु सदृश्य आहे आणि पाटील साहेब अदृश्य आहे. त्यांची अदृश्य शक्ती काम करीत आहे. जी नजरेला पडत नाही कोणाच्या.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** नाही आहे भाऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कॉन्ट्रॅक्टरचे सोडुन, किती कर्मचारी उपलब्ध आहे तुमच्याकडे.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** भाऊ आहे. आता ५० कर्मचारी आहे.

**सौ.ज्याती चव्हाण :-** फॅगींग मशिन किती आहे.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** १६ मशिन आहे. १६ पैकी ६ चालु आहे. ९ खराब आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मला वाटते आपण शहरामध्ये प्रत्येक वस्तु करु शकतो. आणि होणारा जो प्रादुर्भाव आहे ते कमी करु शकतो.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** नक्की भाऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** पाटील साहेब, अस्थापना विभागामार्फत आरोग्य विभागाने काही तरी कर्मचारी घेतलेले आहे. ते काही तरी कमी पडत आहे. तर त्याला वेळ लागत आहे फॅगींगसाठी आणि अबेटींगसाठी. तर अस्थापना विभागात आपण पुन्हा प्रस्ताव पाठवुन जास्ती मनुष्यबळाची मागणी करावी. किंवा कश्या पध्दतीने आपल्याला मनुष्यबळ वाढवुन ते काम कसे लवकरात लवकर अटोपता येईल. जेणे करुन प्रादुर्भाव वाढणार नाही. प्रत्येक घरापर्यंत तो पोहचणार नाही. आणि त्याच्यावर वेळेत उपाययोजना करता येईल. त्यादृष्टीने मला वाटते की, आरोग्य विभागाने काम केले पाहिजे. पण तसे होतांना दिसत नाही. पाटील साहेब तुम्ही सांगतात. १ लाख १६ हजार घरांमध्ये तुम्ही आतापर्यंत फवारणी केली अबेटींग केली म्हणत आहे. १ लाख १६ हजार म्हणजे शहरात याच्यापेक्षा जास्त घरे नसावेत. जर १ लाख १६ हजार घरांमध्ये तुम्ही फॅगींग आणि अबेटींग केली तर मला असे वाटतेकी, प्रत्येक घरामध्ये फॅगींग आणि अबेटींग झाली पाहिजे होती. स्लम ऐरिया जो शहराच्या चारही भागात आहे त्या ठिकाणी पेशन्ट जास्त आढळत आहे.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** भाऊ आता आम्ही फॅगींगचे शेड्युल करत आहोत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पावसाळा संपत आला पावसाळा.

**श्री.प्रशांत नाईक :-** पाटील साहेब, तुमच्या त्या सुधीर सोनवालला जर फोन केले ना फॅगींगसाठी तर तो म्हणतो जेथे डेंग्यु पेशन्ट आढळलेले आहे तेथेच आम्ही जाणार आहे. असे काही आहे का ?

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** नाही, भाऊ तो विषय असा आहे की, डेंग्युचा जो रुग्ण असतो ना कन्फर्म त्याच्या घराच्या आजुबाजुचे २०-२५ घरे केली पाहिजे. त्याचा मच्छर त्या भागातच असतो.

**श्री.प्रशांत नाईक :-** म्हणजे आम्हाला डेंग्युची वाट पाहवी लागेल. आम्हाला डेंग्यु करावा लागेल मग तुम्ही फवारणी कराल का ? तो तूमचा जो सुधीर सोनवाल नावाचा कर्मचारी आहे ना त्याला जर फोन केला ना तो डायरेक्ट सांगतो तेथे की, जेथे डेंग्युचा पेशन्ट आढळला त्याच ठिकाणी आम्हाला करायची ऑर्डर आहे. कोणी दिली अशी ऑर्डर ? अशी ऑर्डर कोणी दिली तुम्हाला.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** भाऊ, फॅगींग वाढवितो आहे दोन चार दिवसात.

**श्री.प्रशांत नाईक :-** पण तुम्हाला ही अथॉरिटी कोणी दिली आहे. तुम्ही जी उत्तरे देतात सन्मा.सदस्यांना ज्या ठिकाणी डेंग्युचा पेशन्ट आहे त्याच ठिकाणी करणार आहे आम्ही. हे कोणी सांगितले तुम्हाला.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** भाऊ, जे जिल्हा मलेरिया अधिकारी आहेत ना. जे गव्हर्नमेंटचे अधिकारी आहेत. डिप्युटी डायरेक्टर त्यांनी म्हटले आहे. फॅगींग करणे, फॅगींग फक्त बंद घरात केली पाहिजे. बाहेर केली तर तो मच्छर मरत नाही. तो बाहेर निघुन जातो. तर तो घर बंद करुनच आणि त्या घराजवळचे १०-१५ घर केले पाहिजे.

**श्री.प्रशांत नाईक : -** आम्ही घरातच सांगतो आहे ना. आम्ही कोणते घराच्या बाहेर सांगतो आहे. आम्ही पण घरातच सांगतो आहे ना नागरीकांच्या.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** हो भाऊ करतो, आणि तुम्ही सुचना करा केव्हाही त्याचे पालन होईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** मला पण तुमचे पाय पडावे लागतील बंटी जोशी सारखे. तुमचे पाय पडणारे एक बंटी भाऊ आणि दुसरा मी राहील तुमचे पाय पडणारा.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** करतो भाऊ, काम वाढवितो.

**श्री.प्रशांत नाईक :-** तुम्ही पण मोठे भाऊच आहे आमचे पाय पडले तरी काही फरक पडणार नाही.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** नाही नाही, कर्मचारी वाढवितो मी आणि काम ही वाढवितो.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, डॉक्टर साहेबांनी उत्तरच दिले नाही की, पत्र कधी मिळालेले आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** डॉक्टर साहेब वार्डात फवारणी करायला पाठवुन द्या कर्मचारी.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** बरं. नक्की नक्की, मी पर्सनल भेटेल तुम्हाला. प्रत्यक्ष भेटतो, सर्व नगरसेवकांना भेटतो.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ओके.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** नितीन भाऊंची पण भेट नाही माझी, त्यांना ही भेटतो.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मला उत्तर तर द्या पत्र कधी मिळाले आपल्याला.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** काय भाऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** डेंग्युची फवारणी करणे संदर्भात उपाययोजना करणे संदर्भात आपल्याला महापौरांकडुन आणि आमचे सन्मा.श्री.नवनाथ भाऊंकडुन पत्र कधी मिळाले होते आणि आदेश कधी मिळाले होते. याचे फक्त उत्तर द्या मला तारीख सांगा.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** पत्र मिळाले मला, मागे मिळाले. तारीख नाही आठवत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आठ महिने झाले साहेब, आठ महिने.

**मा.सभापती :-** पाटील साहेब, शहरात फक्त डेंग्यु नाही तर साथीचे दुसरेही आजार आहे. जेथे डेंग्यु झाला असेल तेथेच आपण फवारणी करणार हे काही योग्य नाही. ज्या ज्या परिसरात कुठलेही, सदृश्य म्हणत आहे ना तुम्ही. डेंग्यु सदृश्य म्हणजे तो डेंग्यु असु शकतो किंवा नसु शकतो किंवा साथीचा समजा मलेरिया असेल टायफायईड असेल किंवा इतर काही आजार असतील. तर आपल्याला जेथे जेथे ज्या भागातुन पेशन्ट आढळुन येत असतील त्या परिसरात फवारणी करायला काय अडचण आहे. खरं तर आपण कुठल्याही गोष्टीला प्रथम उपचार असतात.आपण प्रथम उपचार कुठेच करत नाही. सगळ गंभिर होऊ देतो मग त्याच्यावर उपचार करायला जातो. आणि अनावश्यक त्याच्यावर खर्च करावे लागतात. आपण सुरवातीलाच साफसफाईला महत्व दिले कचरा वेळेवर उचलला, गटार वेळेवर साफ झाली. आजु बाजुला समजा वस्त्या आहे दाट वस्त्या आहेत. त्याठिकाणी एखादी रिकामी जागा आहे. त्याच्यावर जर गवत उगलेली असेल. आपण मशिन घेऊन ती गवत साफ केली पाहिजे. आणि हे केव्हा झाले पाहिजे पावसाळयाच्या सुरवातीच्या दिवसाला, जेणे करुन आपल्या शहरात कुठलाही साथीचा आजार येणार नाही. आपल सगळ होऊन जातो आणि मग अनावश्यक खर्च त्याच्यावर करावे लागतात. वेळेवरती कुठलही काम करत चला. आणि नागरीकांना अनावश्यक खर्च कराव लागत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, संपुर्ण सभागृह अर्ध्या तासापासुन चर्चा करत आहे. परंतु मी म्हणतो तुमच्या संपुर्ण अर्ध्या तासाच्या चर्चेमध्ये एकाही सदस्याचे समाधान झाले असे उत्तर जर आपल्याला पाटील साहेबांकडुन मिळाले तर मी समजतो, त्यांच्याकडुन समाधानकारक उत्तर मिळवा मी त्यांना रु.१०००/- चे बक्षिस देईल.

**मा.सभापती :-** भाऊ, आता त्यांच्याकडुन उत्तर घ्यायचे नाही. कृती करुन घ्यायची आहे मागे लागुन.

**श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी :-** भाऊ स्पीड वाढवितो कामाचा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी म्हणतो आपला एक विशेष करमणुक विभाग सुरु करा. आणि करमणुक अधिकारी म्हणुन पाटील साहेबांची नियुक्ती करुन टाका.ते सभागृहाची एक तास करमणुक करु शकतील. परंतु समाधानकारक उत्तर देऊ शकणार नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, कुत्र्यांचा जो टेन्डर दिलेला आहे. ते कोणत्या ठिकाणी कुत्रे पकडत आहे.

**मा.सभापती :-** निर्बीजीकरणचा विचारत आहे का तुम्ही. निर्बीजीकरण पाटील साहेब.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** सन्मा.सभागृह, सन्मा.सभापती, कुत्रे निर्बीजीकरणाच काम चालु झालेल आहे. आपल्याकडे ज्या ज्या तक्रारी लेखीस्वरुपात येतात. त्यानुसार आपण त्या कर्मचाऱ्यांना इन्टीमेशन देतो आणि तेथे कुत्रे पकडुन पुढची प्रोसेस केली जाते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** लेखी कोणीही नगरसेवकाने द्यायची का ?

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** नाही. बऱ्याच नागरीकांनी आपल्याकडे लेखी तक्रारी केलेल्या आहेत. त्यानुसार आपण ज्या पहिले येतील किंवा ज्या महत्वाच्या आहे. जे अर्जंट करणे अपेक्षित आहे. त्यानुसार आपण ते करुन घेत आहोत. कारण याबाबतचा हे काम बऱ्याच दिवसांपासुन बंद असल्यामुळे मोठ मोठया तक्रारी येत आहे. परंतु ते सगळे काही एकाच वेळी निवारण करणे शक्य होत नसल्याने आपण ते हळुहळु प्रमाणात चालु केलेले आहे ते काम.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता पर्यंत किती कुत्र्यांवर कार्यवाही झाली.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** आता पर्यंत निर्बीजीकरणाची प्रोसेस २५० कुत्र्यांवर करण्यात आलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कोणत्या कोणत्या भागात, प्रभागातुन उचलले आहे.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** मला ती माहिती घ्यावी लागेल, आता सद्या माझ्याकडे नाही. मी देतो तुम्हाला ती माहिती.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ज्या भागातुन पकडतात कुत्रे ४ दिवसानंतर त्याच भागात सोडतात ना.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** हो हो.

**मा.सभापती :-** पाटील साहेब, प्रभाग निहाय काम चालु आहे का ?

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** नागरीकांच्या ज्या तक्रारी येतात ना की, आमच्या प्रभाग आम्ही राहतो आणि कुत्र्यांच प्रमाण जास्त आहे. त्यानुसारही केली जाते. असे प्रभाग वाईज केलेले नाही.

**मा.सभापती :-** मग त्याच्यावर नियंत्रण आपले आहे की, संबंधीत एजन्सीचे आहे. ते त्यांचे मनाने काम करतात.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** नाही, आपण सांगातो त्याप्रमाणे करतात ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाटील साहेब याच्यामधील फक्त एक प्रश्न आहे की, हा मक्ता देतांना आपण एक चर्चाही केलेली होती सभागृहामध्ये की, जी कावरलेले कुत्रे आहेत. त्यांना मारण्याच्या संदर्भात सुध्दा कायद्यामध्ये तरतुद आहे. तर आता पर्यंत आपण हे काम दिल्यानंतर कावरलेल्या कुत्र्यांची संख्या काही आयडेंटीफाय झाली का ? आणि ती झालेली असल्यास त्याच्यावर काय कार्यवाही करण्यात आली. कावरलेल्या कुत्र्यांच्या बाबतीत. जी अत्यंत आजारी आहे आणि मनुष्याला त्या कुत्र्यापासुन जिवाला धोका होऊ शकतो. अश्या कुत्र्यांची संख्या आयडेंटीफाय करुन त्यांना मारणे कायद्याच्या तरतुदीच्या अनुषंगाने आहे. तर अशी संख्या बद्दल काही माहिती आहे का ?

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** तसा ऐकझ्याक्ट आकडा आम्ही घेतलेला नाही. कारण आपल्या हे एक एक भागवाईजच काम करावे लागणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो मी म्हणुनच म्हणतो की, सदरहु संस्थेला आपण या पध्दतीची सुचना द्याव्या की, ज्या वेळेला आपण संपुर्ण जळगांव शहरातुन वेगवेगळया भागातुन ही मुकाट कुत्रे पकडतो आणि त्याच्यावर निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करतो. त्याच वेळेला अश्या पध्दतीने मोकाट कुत्र्यांपैकी जी कावरलेली कुत्रे असते. त्यांच्या बाबतीतला सुध्दा एक सर्व्हे करावा. आणि त्या सर्व्हेच्या अनुषंगाने रितसर त्याचे सोपस्कार पार पाडुन अश्या कुत्र्यांना सुध्दा मारण्याच्या संदर्भात कार्यवाही करावी.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** हो त्या बद्दलची चर्चा आपण केलेली आहे भाऊ. जी जास्त कावरलेले कुत्रे आहे ना त्यांना मारणे संदर्भात आपण मक्तेदारासोबत चर्चा केलेली आहे. आपण या कामावर देखरेख करण्याकामी जी डॉक्टरांची समिती नेमली आहे ना.त्याच्या समोर हा विषय घेतलेला होता. त्यांनीही याला मान्यता दिलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर अश्या ज्या संख्या आहे ना ती आयडेंटीफाय करुन पुढच्या स्थायी समितीच्या सभेसमोर तो सुध्दा अहवाल ठेवण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पाटील साहेब, माझा प्रश्न तुम्हाला आहे, आता दोन दिवस झाले वॉटरग्रेसच्या घंटागाडया ज्या आहे त्या बंद होत्या.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** एक दिवस बंद होत्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्यांनी एक दिवस बंद ठेवल्या. त्यांचा पगार नाही झाले. वापस जर कधी असी परिस्थिती उद्‌भवली भविष्यात तर त्याचे जबाबदार कोण असेल.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** त्यांच्या ज्या मागण्या होत्या. त्या संबंधी चर्चेसाठी त्यांना बोलविण्याचे, कर्मचारी मागण्यांमुळे त्यांनी ते बंद केले होते. तेच चर्चा करण्यासाठी बोलविले आहे त्यांना आयुक्त साहेब आल्यावर.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** काही नाही. फक्त पगाराचीच मागणी आहे ना त्यांची.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** हो पगाराची, पगार झालेवर त्यांनी लगेच काम चालु केले. असे पुन्हा उद्‌भवु नये म्हणुन पुढच्या उपाययोजना केल्या जातील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्यांना आपण बिले अदा केलेली आहे. काही काही लोकांची एक महिना नाही दिले पण काही लोकांची ३-३ व २-२ महिने पगार राहिलेले आहे वॉटरग्रेस वाल्यांचे.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** असे अडचणी येऊ नये म्हणुन त्यांच्याशी चर्चा करुन पुढचा निर्णय घेण्यात येणार आहे. असे उद्‌भवणार नाही अशी उपाययोजना करण्यात येईल.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ एक मिनीट, पाटील साहेब आता त्यांनी एक दिवस काम बंद ठेवले. मग आता त्याचे काय ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्याला दंड करा.

**मा.सभापती :-** त्याच्यावर कार्यवाही काय ?

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** ते आयुक्त साहेबांशी चर्चा करुन करता येईल. माझ्या स्तरावर निर्णय घेण्यासारखा नाही हा प्रश्न.

**मा.सभापती :-** याच्या आधी काही घटना घडल्या अश्या याच्या आधी ही काम बंद होत. तेव्हा काय निर्णय घेतला आपण.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** काम बंद ठेवण्याचे असे काही झालेले नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मागे पण झाले ना.

**मा.सभापती :-** मागे पण थांबविलेले आहे काम.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त,आरोग्य विभाग :-** मक्तेदाराचे कर्मचाऱ्यांनी असे काम बंद ठेवण्याचे नाही झालेले.

**मा.सभापती :-** हो साहेब, तुम्ही नसतांना झालेले आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो साहेब झाले आहे.

**मा.सभापती :-** दंडवते साहेब असतांना सुध्दा अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळेस ही झाले होते त्या वेळेस काय निर्णय घेतला आपण. काम थांबविले तेव्हा.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** काम थांबविले त्यानंतर ते जास्त दिवस थांबले त्यामुळे आपण आपल्या.

**मा.सभापती :-** संबंधीत ठेकेदाराला याच्यासाठी केलेली आहे का काही कार्यवाही.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** त्यावेळेची दंडासंबंधीत माझ्याकडे आता तरी माहिती नाही. माहिती घेवुन मी तुम्हाला कळवितो.

**मा.सभापती :-** त्यांचे पगार करणे ही कोणाची जबाबदारी आहे.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** मक्तेदाराची.

**मा.सभापती :-** मग मक्तेदाराच्या चुकीने जर काम थांबवत असेल. तर त्याचा नागरीकांना जो भुर्दंड बसतो, त्रास सहन करावा लागता. त्याच्या बाबतीत आपण काय निर्णय घेतो.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** तो आयुक्त साहेबांच्या स्तरावर चर्चा करुन निर्णय घ्यावा लागेल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, यांचे असे म्हणणे पडते की, बिले ठेकेदाराला मिळत नाही त्यामुळे तो पगार देत नाही. पण मला सांगा एक महिन्याचे तुम्ही चालु बिल काढलेच आहे. काही लोकांचे दिड दिड दोन दोन महिने

पगार राहिले आहे. त्याकरीता त्यांनी त्या दिवशी अंदोलन केले. आता झाले आणि पुढील प्रकार त्यांनी जर दोन चार महिन्यात बिल नाही दिले. वापस हा प्रश्न उद्भवणार. याची जबाबदारी कोण घेणार आहे.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** असे प्रश्न पुढे उद्भवणार नाही याची काळजी घेतली जाईल. आणि मक्तेदार जर असे आडमुठेपणाची भुमिका घेत असेल तर त्याच्यावर ही कार्यवाही करणेचे प्रस्तावीत केले जाईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब, काम बंद झाल्यास ही जबाबदारी कोणाची राहिल. मी आता तुम्हाला ५० टक्के गॅरंटी देतो. पुढच्या महिन्यात काम बंद होत आहे. सांगतो मी तुम्हाला चॅलेंज आहे माझ.त्याची जबाबदारी कोण घेईन.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** या सर्व बाबींची पुढच्या स्तरावर आयुक्त साहेबांशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** लवकरात लवकर करा. नाही तर पुढे तुमचा दसरा, दिवाळी येत आहे. कचरा रोडावर पडला की, याची परिणाम फार वाईट होतील बरं.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** असे प्रकार पुढे घडु नये द्यायची प्रशासन काळजी घेईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती महोदय, आरोग्यधिकारी यांचेशी काम आहे जरा.सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हा बोला भाऊ.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती महोदय, माझ्या प्रभागामध्ये कायम कर्मचारी आहे. साफसफाईला, गटार कामगार झाडु कामगार कायम कर्मचारी आहेत. ते कमी पडत असतात. आता प्रभागात नविनच रस्ते झालेले आहे. झाडु कामगार गटार कामगार कमी पडतात. त्यामुळे मक्तेदाराचे सफाई कामगार मला मिळावे. तरी जसे बाकीच्या प्रभागात जसे केलेले आहे आरोग्यधिकारीने तसे आमच्या प्रभागात तीन झाडु कामगार आणि तीन सफाई कामगार वाढवुन देण्यात यावे.

**मा.सभापती :-** कामगार वाढवून मिळावे असे.

**श्री.प्रशांत नाईक :-** हो. तरी आरोग्यधिकारी पवन पाटील साहेब.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** हो विचारा.

**श्री.प्रशांत नाईक :-** तुम्ही बाकीचे ज्या आमच्या जो स्लम भाग आहे तांबापुरा तेथे.

**मा.सभापती :-** ठिक आहे पाटील साहेब माहिती घेऊन नियोजन करुन देतील.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** ठिक आहे तेथील एस.आय.शी चर्चा करुन नियोजन करुन देतो मी.

**श्री.प्रशांत नाईक :-** पाटील साहेब मी तुम्हाला सांगतो ना. जसे तुम्ही स्लम भागात वाढुन दिलेले आहे बाजुला तसेच गावठाण भागात वाढुन द्या फक्त.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** हो प्रभाग क्र.१५ मध्ये करुन दिलेले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** तसेच मला गावठाण भागात पाहिजे. जसे तुम्ही स्लम भागात करुन दिले ना.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** हो करतो मी नियोजन करतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पाटील साहेब, सतत गैरहजर राहतात कर्मचारी त्याचे काय करतात तुम्ही.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** त्यांचा एक दिवसाच्या कपातीचा आपण प्रस्ताव ठेवतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ओ साहेब, माझ्याकडे रेकॉर्ड आहे. माझ्या वार्डातील लोकं सतत गैरहजर आहे. रेकॉर्ड आहे माझ्या जवळ हे. तुमच्या टिप्पणीवर.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** कायम कर्मचाऱ्यांचा म्हणत आहे का ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कायम कर्मचारी हे माझ्या जवळ टिप्पणी आहे. एक एक वर्ष हे लोकं कामावर येत नाही. आणि यांच्या जागेवर दुसरे माणस पण देत नाही.

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** त्यांच्यावर कार्यवाही करण्या संदर्भातील फाईल अस्थापना विभागाकडे चालु आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ते कामावर येत नाही तर त्यांच्या जागेवर माझ्या वार्डात लोक नको का ?

**श्री.पवन पाटील, सहा. आयुक्त, आरोग्य विभाग :-** ते उपाययोजना कराव्या लागतील त्या. कर्मचारी आपल्याकडे लिमिटेड असल्यामुळे. उपाययोजना करतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कन्हयालाल राजेंद्र चव्हाण, विनोद मुरलीधर अलकंडे, अनिल किसन बेंडवाल, तिन कर्मचारी सतत गैरहजर राहतात सफाई कामगार.

**श्री.पवन पाटील,आरोग्याधिकारी :-** आता तरी माझ्याकडे याबद्दलची माहिती उपलब्ध नाही.त्याची माहिती घेवुन मी आपल्याला देतो.

**मा.सभापती :-** नवनाथभाऊ तसा तुम्ही त्यांच्याकडे तक्रारी अर्ज द्या. त्याच्यावर निर्णय घेतला जाईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ त्यांचेच आहे हे.

**मा.अतिरीक्त आयुक्त :-** सन्मा.सभागृह.

**मा.सभापती :-** नवनाथभाऊ आपल्याकडून द्याना आपल्या निदर्शनास आले आहे. आपण तसा अर्ज किंवा पत्र त्यांना द्या.

**मा.अतिरीक्त आयुक्त :-** सन्मा.सभागृह, सन्मा.सभापती साहेब जर असे काही गैरहजरचे रिपोर्ट असतील आरोग्य विभागाकडून तर आस्थापना विभागाकडून त्यांच्यावर कारवाई होते.चौकशी समिती वगैरे लाऊन.

**मा.सभापती :-** आज आपले लेखाधिकारी श्री.कपिल पवार साहेब यांचा वाढदिवस आहे. त्यांना वाढदिवसाच्या खुप खुप शुभेच्छा भावी आयुष्य त्यांच खुप सुख समृध्दीचे व भरभराटीचे व आरोग्यदायी जावे. तरी मी सभागृहाला विनंती करेल की, आपल्या त्यांचा सत्कार करायचा आहे पुष्पगुच्छ देवुन तरी आपण पुष्पगुच्छ येईपर्यंत थांबायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** संपुर्ण सन्मा.सभागृहातर्फे कपिल पवार साहेब यांना शुभेच्छा आणि रिटर्न गिफ्टची त्यांच्याकडुन अपेक्षा की सगळ्या मक्तेदारांचे बिल लवकर काढा म्हणजे मक्तेदार काम गतीने वाढवतील

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती महोदय, सभापती महोदय

**मा.सभापती :-** हो भाऊ बोला.

**श्री.प्रशांत नाईक :-** ईलेक्ट्रिक विभागाचे एस.एस.पाटील साहेब यांच्याशी थोडेसे बोलायचे आहे. त्यांना बोलवा ना जरा.

**मा.सभापती :-** कोण भाऊ

**श्री.प्रशांत नाईक :-** एस.एस.पाटील ईलेक्ट्रिक विभाग

**मा.सभापती :-** बोलवुन घ्या पाटील साहेबांना, आणि आताचे जे विषय आहेत. हे सर्व सभा ही क्लोज करून ही अवांतर चर्चा म्हणुन प्रशांतभाऊ आता आपले सगळे विषय हे संपलेले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** हो

**मा.सभापती :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** १० टक्के महत्वाचे असतात आणि ९० टक्के अवांतर असतात म्हणुन अवांतर विषयाला कुठे गांभीर्याने घेतच नाही प्रशासन

**मा.सभापती :-** आणि काय होत भाऊ प्रोसेडिंगला जेव्हा विषय येतात ना, आपण पत्रिकेवरील सर्व विषय वाचले तर सगळे वाचले जाते आणि बाकीचे अवांतर विषय आपल्याला वेळेनुसार वाचले जातात. आता याच्यात काही अवांतर विषय येतात. आपले ते ठराव वगैरे सगळे करायला थोड अडचणीच होत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे.

**मा.सभापती :-** याच्यात सुटसुटीत पणा यावा त्याच्यासाठी आपण आधी सगळे विषयपत्रिकेवरील विषय घेवुन मग अवांतर चर्चा करायला हरकत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे. योग्य आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** पाटील साहेब

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** हो बोला भाऊ

**श्री.प्रशांत नाईक :-** आपण ईच्छादेवी ते डि-मार्ट जे पोल शिफ्टिंग केले होते.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** हो

**श्री.प्रशांत नाईक :-** याच्यामागच नियोजन काय होते आणि कोणत्या निधीतुन केले होते ते काम आपण ? थोडे सांगा ना मला माहिती नाहीये.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** महानगरपालिकेला आपल्याला जो २५ कोटी विशेष निधी मिळालेला होता.त्या निधीमधुन आपण काम केलेल होतं.

**श्री.प्रशांत नाईक :-** किती रूपये खर्च आला होता त्याला

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** मला एक्झॅट सांगता येणार नाही आता परंतू त्याला साधारणपणे २० लाखापर्यंत खर्च आलेला आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** २० लाख रूपये आला होता. महापालिकेचे काय नियोजन होते ते स्थलांतर करण्यामागे

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** स्थलांतर करण्यामागे त्याच नियोजन असं होत की , त्या ठिकाणी जे अतिक्रमण होते. पोलच्या मागच्या साईडला जे अतिक्रमण होत तांबापुरच्या साईडने , तर ते अतिक्रमण होवू नये

आणि रस्त्याचे थोडेसे रूंदीकरण व्हावे. त्याच्यामुळे रस्त्यांच्या कामाकरीता बांधकाम विभागामार्फत त्या रस्त्याचा बजेट टाकण्यात आला आणि मग आपण ते रस्त्याच्या डिवायडरमध्ये आपण ते पोल शिफ्ट केले.

**श्री.प्रशांत नाईक :-** बरोबर , म्हणजे आता तुमच असं म्हणण आहे की तो रस्ता अतिक्रमण मुक्त झाला आहे अस वाटत का तुम्हाला ? तिथे पोल नाहीयेत का आता ते पोल आपण अतिक्रमणमध्ये टाकले नाहीत का ते ?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** भाऊ विद्युत विभागाला सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत त्या रोडची जी बॉंड्री दाखविण्यात आलेली होती. म्हणजे रस्त्याच्या दुभाजका पासुन त्यांनी मला जी तांबापुरच्या साईडला डिवायडर पासुन जी बॉंड्री दाखवली होती. त्यानुसार ते पोल उभे करण्यात आलेले आहेत.

**श्री.प्रशांत नाईक :-** कुणी दाखवली होती तुम्हाला ?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांमार्फत दाखविण्यात आलेली होती.

**श्री.प्रशांत नाईक :-** बांधकाम मधील अभियंता कोण होते?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** नेमाडे साहेब

**श्री.प्रशांत नाईक :-** नेमाडे साहेब , तुम्हाला माहिती आहे का ? की आता आपण जे डिमार्केशन केले आहे महापालिकेने हे पोल जे आपण शिफ्टिंग केलेले आहे. ते पुर्ण पैसे आपले पाण्यामध्ये गेलेले आहे साहेब

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** नाही , नाही भाऊ आता आपण जे पोल म्हणताहेत. ते नागरीकांचे सर्विस कनेक्शन देण्याकरीता , एल टी चे पोल सर्विस कनेक्शनला त्या ज्या वायरी आहेत. त्याला सर्पोर्टींग करून ते पोल मध्ये उभे आहेत. जे आपण म्हणताहेत बाकीचे जे आहेत. डिवायडर मध्ये जी मेन लाईन आहे. तेथे आपण डिपी वगैरे शिफ्ट केलेले आहेत. तिथे जी सिच्युएशन होती ते पोल त्यामुळे शिफ्ट केलेले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब पुन्हा ५ डिप्या रस्त्यामध्ये आहे. त्याच रस्त्यावर पुर्ण ५ डिप्या रस्त्यावर परत आलेल्या आहेत.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** नाही , नाही विद्युत विभागाला त्यांनी जी बॉंड्री दाखवली होती त्याच्यानुसार आपण उभे केलेले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** भाऊ

**श्री.प्रशांत नाईक :-** तुमचापण प्रभाग आहे आणि माझाही प्रभाग आहे.

**मा.सभापती :-** भाऊ ऐका

**श्री.प्रशांत नाईक :-** तुमचापण प्रभाग आहे आणि माझाही प्रभाग आहे.

**मा.सभापती :-** भाऊ ऐकून घ्या. तिथे आता नविन टाकले गेलेले आहे की , पुर्वीचेच आहेत की राहीलेले आहेत. असं म्हणायचे आहे का ?

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती महोदय, दोन डिप्या टाकल्या आहेत आणि तिथे महावितरण कंपनीने तिथे महानगरपालिकेने कुठल्याही प्रकारची दक्षता घेतलेली नाही. त्या पुन्हा अतिक्रमण मध्ये टाकण्यात आल्या आहे.

**मा.सभापती :-** पाटील साहेब परवानगी घेतली आहे का त्यांनी

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** जळगांव शहरामध्ये कुठेही डिपी , ट्रान्सफॉर्मर बसवितात त्याला महावितरण कडुन कुठल्याही प्रकारची परवानगी घेत नाहीत.

**श्री.प्रशांत नाईक :-** राजुभाऊ आपण ज्या डिप्या शिफ्ट केल्या आपण २० /२५ लाख रूपये खर्च करून २५ कोटीमधुन तर त्या तिन डिप्या पुर्ण अतिक्रमण मध्ये आलेल्या आहेत. आपण आता डिमार्ट जवळ केले होते . तर ते पुर्ण अतिक्रमण घालत आहेत ते

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाटील साहेब आपण पालकमंत्री महोदयांच्या बैठकीमध्ये चर्चा केली होती आणि त्यावेळेला ते चौरे साहेब होते आणि त्यांनी सांगीतल होत की मानवतकर साहेबांशी बोलू पण जर कधी महानरपालिकेच्या एनओसी न घेता. अशा पध्दतीने महावितरण जर कधी काम करत असेल. तर आपण त्यांच्या निश्चितपणे काय कारवाई प्रस्तावित करतो.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** आपण अधिक्षक अभियंत्यांना पत्र दिलेले आहे आयुक्त साहेबांच्या सहीने , भाऊ विज अधिनियम जो आहे.त्या विज अधिनियमामध्ये तशी तरतूद आहे आणि आपल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्येही तशी तरतूद आहे की महानगरपालिकेच्या जागेवर महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेतल्यानंतरच पोलचे काम करण्यात यावं. आपण या दोन्ही अधिनियमाच्या तरतूदी नुसार पत्रही दिलेले आहे की तुम्ही महानगरपालिकेची परवानगी घ्या. स्थळ निश्चित करा स्थळ निश्चित केल्यानंतर परवानगी घेवून त्याप्रमाणे काम करावे म्हणुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग ते आपल्या विषयाची गांर्भीयाने घेत नाही का ?

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** नाही महावितरण कंपनीकडुन गांभीर्य घेण्यात येत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग त्याच्याविषयी काय करता येईल महापालिकेकडुन

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** महापालिकेला आता आपले जे डिपार्टमेंट आहे बांधकाम असो पाणी पुरवठा असो किंवा आरोग्य विभाग असो किंवा कोणत्याही म्हणजे महानगरपालिकेच्या प्रशासनाचे आपले जेवढे फिल्ड अधिकारी आहेत. म्हणजे ज्या ज्या ठिकाणी काम चालु असेल तेथे कोणताही अधिकारी त्या जागेवर त्या कामाची पुर्व परवानगी त्या जागेवर पाहणे गरजेचे आहे. कारण आता महावितरण कंपनी त्यांच्या मार्फत २० टक्के काम करते. परंतू संबंधित महावितरण कंपनी ज्या कंझुमर ला कामाची गरज आहे. त्या कंझुमरला काम करायला सांगते आणि तो कंझुमर प्रायव्हेट कॉन्ट्रक्टर नेमून ते काम करतो. आता परिस्थिती अशी आहे की त्या प्रायव्हेट कॉन्ट्रक्टर परवानगी घेत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही पाटील साहेब हे सगळ झाल. परंतू अशा पध्दतीने महावितरण काम करत असतील चुकीचे, महानगरपालिकेच्या कुठल्याही कायदेशीर परवानगी न घेता . तर याच्यावर महानगरपालिका महावितरण वर कुठल्या प्रकारची कायदेशीर कार्यवाही करू शकते.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** त्यांना त्या संदर्भात नोटीसच द्यावी लागेल भाऊ , नोटीस देवुन ते काम म्हणजे जर काम अशा क्षणाला ते थांबवावे लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही पण आता अशी जी काम होवून गेलेली आहेत.ती विना परवानगी काम त्यांनी केलेली आहेत.आपल्या नोटीसला ते प्रतिसाद देत नसतांना . तर याच्यावर विधि विभागाकडून माहिती घेवुन ही कायदेशीर कारवाई का प्रस्तावित करावी , गुन्हा का दाखल करता येईल किंवा न्यायालयीन लढा लढावा लागेल किंवा काय करता येईल.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** भाऊ त्यांना त्या संदर्भात नोटीस देवुन त्यांना ते बंधनकारक कराव लागेल. ते काम केलेले आहे. त्याच्यामध्ये त्यांनी सुधारणा करावी. म्हणजे आपल्याला जर कुठे विकास कामाला अडचणीचे होत असेल , अडचण निर्माण होत असेल तर त्यांना आपल्याला सांगावे लागेल की हे काम परत करू शकत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे तर सांगतो पाटील साहेब आपण त्यांना निदर्शनाला या गोष्टी , या डिमार्ट च्या संदर्भातील विषय जे प्रशांतभाऊ बोलताहेत.त्या विषया संदर्भात मी स्वत: बोललो तिथल्या कनिष्ठ अभियंत्यांशी परंतू त्यांच्याकडे काय होत की प्रत्येकाकडे बोट दाखवुन तो मोकळा होतो. मग ज्यावेळेला जर कधी विना परवानगीने जर एखाद्या घराचे बांधकाम असते तर आपण ते बांधकाम निष्कासित करतो. तर तश्या पध्दतीची याच्या संदर्भातील कायदेशीर तरतूद काय आहे आणि जर कधी कायद्याच्या तरतूदीच्या अनुषंगाने यांच्यावर कायदेशीर गुन्हे दाखल करायचे असतील. तर महानगरपालिकेने यांच्यावर रितसर गुन्हा दाखल करावा महावितरण वर, महावितरण चुकीचे काम करेल त्याचा भुर्दंड महानगरपालिकेवर पडेल. महावितरणमुळे महानगरपालिकेच्या विकास कामांमध्ये जर कधी अडथळे निर्माण होत असतील. तर जर कर कधी त्याच्यामध्ये कायदेशीर प्रोव्हिजन असेल. त्या प्रोव्हिजनचा संदर्भ घेऊन तश्या पध्दतीची कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** चालेल याच्या संदर्भात आपण विधी सल्लागारांचा सल्ला घेऊन पुढची कार्यवाही करु शकतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते तातडीने करा पाटील साहेब, कारण काय होत की, बरेच गोष्टी चर्चा अंती हे सभागृहातच राहुन जातात.पण प्रत्येक्षात कृतीमध्ये होतांना दिसुन येत नाही. ही बाब थोडी गंभीर आहे. आपल्याला त्या रस्त्याचा रुंदीकरण करायचे आहे. त्या रस्त्याचा विकास करायचा आहे. परंतु अश्या अडथडयांमुळे तो विकासही प्रलंबित पडतो. काम करण्याचा उत्साहही संपुन जातो. सन्मा.सदस्य पाठपुरावा करुन ते ही थकुन जातात. मग असे विषय दुर्लक्षीत होतात वर्षानुवर्ष तर असे होता कामा नये.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** याचे लवकरात लवकर विधी सल्लागारांचा सल्ला घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. प्रशांत नाईक :-** साहेब लवकरात लवकर करा.

**मा.सभापती :-** याच्या पुर्वी ही बोललो मी. आता आठ दहा महिन्यापुर्वी नविन डिप्या टाकल्या गेल्या कुठे मेहरुणचा जो पाण्याचा हाड आहे. त्या पुलाजवळ एक इकडच्या बाजुने पुलाच्या एक तिकडच्या बाजुने आता तेथुन आपली अमृतची पिण्याच्या पाण्याची लाईन येणार आहे. आणि त्या डिपी मुळे काम थांबलेले आहे. `आता परत ते भुर्दंड महापालिकेने भरावा की, एमईसीबी करेल ते.

**श्री.एस.एस.पाटील, विद्युत विभाग प्रमुख :-** नाही. महावितरण कंपनी कोणताच खर्च करत नाही. ज्या संस्थेला काम करायचे आहे ती करते तर आपल्यालाच खर्च करावा लागेल.

**मा.सभापती :-** तर याची दक्षता घेतली गेली पाहिजे. कुठे जर डिपी येत असेल तर आपल्या प्रभागाचे जे इंजिनिअर असतात. त्यांनी तुमच्या पर्यंत माहिती पुरविली पाहिजे. आपसामध्ये तुमचा संवाद असला पाहिजे.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती महोदय, आपण यांना फोन करुन सांगतो की, हे चुकीचे आहे पण हे लक्ष देत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, आपण जे म्हणत आहे ते बिल्कुल ठिक आहे. प्रत्येक विभागाचा एक दुसऱ्याशी समन्वय असणे अपेक्षित आहे. आणि समन्वय आणि नियोजन या दोघांचा अभाव जो आहे. तो कुठेतरी दिसुन येत आहे. आणि त्याच्यामुळे वारंवार महापालिकेवरती आर्थिक बोजाही पडतो. आणि विलंब ही होतो.

**श्री.प्रशांत नाईक :-** भाऊ, याच्यात आपल्याला एखाद्या इंजिनिअरवर कार्यवाही करावी लागेल, निलंबीत कराव लागेल.

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**